रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ६
www.ramprahar.com
बुधवार २३ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

रायगड जिल्ह्यात मतदान यंत्र तपासणी कार्यक्रम सुरू/२
पनवेल परिसरात आगीच्या वाढत्या घटना/३
आजपासून भारत-इंग्लंड चौथा कसोटी सामना/८

## महाराष्ट्रातील पहिल्या काचेच्या पुलाचे लोकार्पण




**सिंधुदुर्ग :** महाराष्ट्र राज्यातील पहिला काचेचा पूल सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी येथील नापणे धबधब्यावर उभारण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंगळवारी (दि.२२) या पुलाचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर हा पूल सर्वसामान्य नागरिक आणि पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वैभववाडी येथील नापणे धबधब्यावर सिंधुरत्न योजनेतून हा पूल बांधण्यात आला असून या पुलामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक पर्यटन स्थळ निर्माण झाले असल्याचे मंत्री नितेश राणे यांनी म्हटले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

## आमदार प्रशांत ठाकूर, चिरंजीव अमोघ ठाकूर यांचाही सहभाग; उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करत असले तरी कार्यकर्ते त्यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करतात. यावर्षी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या आवाहनानुसार विक्रमी रक्तदान करून लाडक्या देवाभाऊंना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने पनवेलमध्ये मंगळवारी (दि.२२) विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले.





लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला सन २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या राष्ट्रनिर्माणाच्या ऐतिहासिक प्रक्रियेत महाराष्ट्राचे अमूल्य योगदान असेल यात कोणतीही शंका नाही. लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात महाराष्ट्राचे नेतृत्व असल्यानेच हे शक्य होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वसमावेशक भूमिकेमुळेच राज्याचे ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे स्वप्न मूर्त स्वरूपात होणार आहे, देवेंद्र फडणवीस कसलेले राजकारणी, तर आहेत त्याचबरोबर तितक्याच आत्मीयतेने जनतेच्या अथक सेवेसाठी प्रशासनावर जबरदस्त पकड असणारे, सुशासनाचा आदर्श घालून देणारे, जनतेला लोकाभिमुख सेवा देणारे कार्यक्षम आणि दूरदृष्टीकोन असलेले मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल विधानसभा मतदार संघातील पनवेल, कामोठे, कळंबोली, आकुर्ली, खांदा कॉलनी, खारघर, ओवेपेठ, आदी विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात स्वतः आमदार प्रशांत ठाकूर व त्यांचे चिरंजीव अमोघ ठाकूर यांनी पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात रक्तदान करून समाजाप्रती आदर्श उदाहरण ठेवले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी व इतर पदाधिकाऱ्यांनीही रक्तदान केले. (पान २ वर..)

### ‘देवाभाऊ सर्वांचे लाडके’

मुख्यमंत्री सर्वांचे लाडके देवाभाऊ आहेत. ते आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करत आले असले तरी वाढदिनी सामाजिक उपक्रमे मोठ्या स्वरूपात आयोजित करून शुभेच्छा दिल्या जातात त्याच अनुषंगाने पनवेलमध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राला पुढे नेण्याचे काम करत आहेत त्यामुळे ’देवाभाऊ’ सर्वांचे लाडके नेते आहेत, महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विकासासाठी त्यांना निरोगी उदंड आयुष्य लाभो, अशा वाढदिवसानिमित्त शुभेच्छा आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिल्या.

## सरकारकडून कृषी क्षेत्राला बळकटी -मुख्यमंत्री

**गडचिरोली : प्रतिनिधी**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सरकार भिकारी आहे, अशा आशयाचे विधान केले. त्यांच्या या विधानावर मुख्यमंत्री फडणवीस यांनीही नाराजी व्यक्त करून स्पष्ट प्रतिक्रिया गडचिरोली येथे व्यक्त केली आहे. सरकारकडून कृषी क्षेत्राला बळकटी देण्याचे काम सुरू आहे, असे ते या वेळी म्हणाले.



फडणवीस मंगळवारी (दि.२२) गडचिरोलीच्या दौऱ्यावर होते. या वेळी त्यांना पत्रकारांनी कोकाटे यांच्या या विधानाविषयी विचारण्यात आले. तेव्हा त्यांनी स्पष्ट केले की, जर कोकाटे यांनी असे वक्तव्य केले असेल, तर मंत्र्यांनी असे वक्तव्य करणे अतिशय चुकीचे आहे. त्यांनी शेतकऱ्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले. यासोबतच, त्यांनी शेती क्षेत्रात दरवर्षी पाच हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्याची घोषणा केली. या गुंतवणुकीची सुरुवात यावर्षीपासूनच करण्यात आली आहे. पुढील पाच वर्षांमध्ये शेतीमधील एकूण गुंतवणूक पंचवीस हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मते, अशा प्रकारचे वक्तव्य योग्य नाही, शेतीत मोठ्या प्रमाणावर निधी गुंतवून कृषी क्षेत्राला बळकटी देण्याचा प्रयत्न करत आहे. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहे. ही गुंतवणूक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि शेतीला अधिक फायदेशीर बनवण्यासाठी महत्त्वाची ठरेल.

## परप्रांतीयाकडून मराठी तरुणीला मारहाण

### कल्याणमधील घटना

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याणमध्ये रिसेप्शनिस्ट तरुणीला परप्रांतीय तरुणाने क्लिनिकमध्ये बेदम मारहाण केली आहे. या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेचा संतापजनक व्हिडिओ समोर आला आहे.



नांदिवली येथील श्री बालचिकित्सा क्लिनिक मध्ये डॉक्टरांच्या केबिनमध्ये घूसणाऱ्या व्यक्तीला आत जाऊ नका, आत लोक आहेत असे रिसेप्शनिस्ट तरुणीने सांगितले, तर त्या व्यक्तीने त्या तरुणीला बेदम मारहाण केल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. गोकुळ झा असे मारहाण करणाऱ्या परप्रांतीय तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने मानपाडा पोलीस ठाण्यात गोकुळ झा याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस याप्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

या घटनेचा व्हिडिओ समोर आला आहे. त्यात काही लोकांनी मारहाण करणाऱ्याला अडविण्याचा प्रयत्न केला मात्र तो मारहाण करताना दिसत आहे.

## निवडक

### देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराडला दणका

**बीड :** जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडने दोषमुक्तीसाठी न्यायालयात विनंती अर्ज केला होता. न्यायालयातील या अर्जावर मंगळवारी सुनावणी झाली असून, बीड सत्र न्यायालयाने वाल्मिक कराडचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे, देशमुख कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून वाल्मिक कराडसह आरोपींवर आता खंडणीसह खूनाचही खटला चालू राहणार आहे.

### ‘त्या’ १२ आरोपींच्या सुटकेवर २४ जुलैला होणार सुनावणी

**मुंबई :** साखळी बॉम्बस्फोटांसंबंधित सर्वच्या सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. महाराष्ट्र सरकार या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. त्यानुसार आता या निकालाला राज्य सरकारद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २४ जुलैला होणार आहे.

## कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्राकडून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या किनारपट्टीला २३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० पासून ते २४ जुलै २०२५ रात्रौ ८.३० पर्यंत ३.६ ते ४.३ मीटर तसेच पालघर आणि रायगड जिल्ह्यांच्या किनारपट्टीला २४ जुलै २०२५ रोजीचे रात्रौ ८.३० पर्यंत ३.४ ते ३.८ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली.



रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये तसेच सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात पुढील २४ तासासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असल्याने जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनाही आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात ११७.८ मी.मी. पाऊस झाला. या पावसामुळे मौजे हदगाव नखाते, येथील सात ते आठ नागरिक पुराच्या पाण्यात घराच्या छतावर अडकले असता आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाने त्यांना सुखरूप बाहेर काढले आहे. तसेच बाधित नागरिकांना सुखरूप स्थळी हलविण्यात आले असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

अतिवृष्टीमुळे हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील मौजे बरडा येथे तीन व्यक्ती मंदिरात पुरामुळे अडकले असता स्थानिक बचाव पथकामार्फत सुरक्षित स्थळी हलविण्यात आले असून येथील परिस्थिती नियंत्रणात असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## अपहारप्रकरणी लिपिकाला अटक

**माणगाव : बातमीदार**

१६ लाख ३८ हजार ५०० रुपयांचा अपहार करणाऱ्या लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात कंत्राटी पद्धतीने लिपिक म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला गोरेगाव पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी प्रतीककुमार जयवदनभाई पुरानी (रा. सिलिकॉन पॅलेस, सुरत, राज्य गुजरात) यांनी गोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

सुमित अनिल जाधव (वय २८) रा. न्हावे, ता. माणगाव हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात कंत्राटी पद्धतीने लिपिक म्हणून काम करीत होता. त्याने १२८ विद्यार्थ्यांची दिशाभूल करून त्यांना धमकी देत त्यांच्याकडून स्वतःचे गुगल पे वर १५ लाख ७८ हजार ५०० रुपये जमा करून घेतले आणि विद्यापीठ प्रशासनाकडून घेण्यात आलेल्या स्टेट बँकेच्या चेकवर ६८९० रक्कम नमूद असताना त्यात फेरफार करून ६०,००० असा एकूण १६ लाख ३८ हजार ५०० रुपयांचा अपहार केला.

सुमित अनिल जाधव याला न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.

## पोलीस उपनिरीक्षक लाच घेताना अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

अंतरिम जामीन नामंजूर करून वडिलांना अटक करेन अशी भिती दाखवत लाचेची मागणी करत ५० हजाराची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन वाईकर यांना अटक केली आहे.



तक्रारदार यांचे वडिलांचे विरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये कलम वाढ करून, तक्रारदार यांचे वडिलांचा अंतरिम जामिन नामंजूर करून त्यांना अटक करेन अशी भिती घालत असलेबाबत व अटक न करणेकरीता पनवेल शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सचिन वाईकर यांनी एक लाख रूपयांची मागणी करीत असल्याबद्दल तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार २१ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक पनवेल येथे सापळा लावला असता वाईकर यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम ५० हजार रूपये सचिन वाईकर यांनी त्यांचे व्हॅगन आर कारमध्ये खासगी व्यक्ती रविंद्र उर्फ सचिन सुभाष बुट्टे यांचेमार्फत स्वीकारल्याने आढळून आले. त्याचवेळी त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

लाचलुचपत विभाग रायगडच्या उपअधिक्षक सरिता भोसले, निरीक्षक निशांत धनवडे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव, हवालदार महेश पाटील, पोलीस शिपाई नवदीत नांदगावकर यांनी ही कारवाई केली आहे.

## ‘महाराष्ट्राला जागतिक दर्जाचे कौशल्य केंद्र बनवणार’

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला २०४७ पर्यंत जागतिक दर्जाचे कौशल्य केंद्र बनविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यासाठी सर्वांच्या सूचना लक्षात घेवून सर्वसमावेशक धोरण अमलात आणेल, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग मार्फत ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ तज्ञ कार्यशाळा झाली. यावेळी विविध सामंजस्य करार देखील करण्यात आले. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर, कौशल्य विकास आयुक्त लहुराज माळी, ‘मित्रा’चे अतिरिक्त मुख्याधिकारी अमन मित्तल आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेसाई, वरिष्ठ अधिकारी, उद्योग क्षेत्रातील प्रमुख, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, बहुराष्ट्रीय संस्था आणि विकास भागीदार सहभागी झाले होते.

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की,जागतिक पातळीवरचे उच्च दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले तर रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतील. यासाठी कौशल्य विकास विभाग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थाशी भागिदारी करत आहे. स्थानिक विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगार मिळण्यासाठी हे विचारमंथन खूप गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## दिल्लीत एअर इंडियाच्या विमानाला आग

**नवी दिल्ली :** हाँगकाँगहून दिल्लीला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला मंगळवारी दिल्लीच्या इंदिरा गांधी विमानतळावर उतरताच आग लागली. यामुळे विमानाचे थोडे नुकसान झाले. सुदैवाने सर्व प्रवासी, क्रू आणि वैमानिक सुरक्षित आहेत. हाँगकाँग – दिल्ली विमान क्रमांक एआय ३१५ दिल्ली विमानतळावर उतरले. विमान उतरले आणि एका सहाय्यक इलेक्ट्रिक युनिट (एपीयू) मध्ये आग लागली. सिस्टम डिझाइननुसार एपीयू आपोआप बंद झाले. तज्ज्ञ तपासणी करुन आग लागण्याचे कारण शोधत आहेत.

## बोरघाटात ट्रकची कारला धडक

### एक ठार; तीन जण जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गांवर बोरघाटात सायमाळ जवळ ट्रकने समोरील कारला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात कारमधील एक महिला जागीच ठार झाली तर अन्य तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.


बोरघाटातून ट्रक (एचआर ३८ झेड ४५७२) हा चालक मुबारक (रा. मध्यप्रदेश) हा खोपोली हुन लोणावळा कडे घेऊन जात असताना तो बोरघाटात आला. तेव्हा त्याची गाडी चढत नसल्याने त्याने ट्रक वळवून परत खोपोलीकडे जात असताना सायमाळ जवळील तीव्र उतारावरील वणावळावर आला. या वेळी चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील येणाऱ्या इको कार (एचएच ११ डीएच ३२१२) ला धडक दिली. यामध्ये कार आणि ट्रक खड्ड्यात जाऊन पलटी झाल्याने भीषण अपघात झाला. (पान २ वर..)

## पनवेल महापालिका क्षेत्रातील बोगस डॉक्टरांवर होणार कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशाने व उपायुक्त प्रसन्नजीत कारलेकर यांच्या सूचनेप्रमाणे पनवेल महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडून पनवेल महापालिका क्षेत्रातील बोगस डॉक्टरांवर कारवाईस सुरुवात करण्यात येणार असल्याचे मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी सांगितले आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर, तळोजा, कळंबोली, कामोठे व पनवेल येथील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनेमार्फत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची माहिती व संबंधित मेडिकल कॉन्सिलची नोंदणीची कागदपत्रे, वैद्यकीय पदवी प्रमाणपत्र व बायोमेडीकल वेस्ट प्रमाणपत्र वैद्यकीय आरोग्य विभागाकडे प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने बोगस डॉक्टर शोध मोहीम कारवाईला सुरुवात होणार आहे.



यासाठी प्रभाग निहाय क्षेत्रीय समिती गठीत करण्यात आली असुन या समितीमध्ये प्रभाग अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश आहे. या पथकामार्फत खाजगी वैद्यकीय व्यावसायीकांच्या मेडिकल कॉन्सिलची नोंदणीची कागदपत्रे, वैद्यकीय पदवी प्रमाणपत्र व बायोमेडीकल वेस्ट प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल (MMC), मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन (MCIM), महाराष्ट्र कॉन्सिल ऑफ होमियोपॅथी (MCH) व महाराष्ट्र डेंटल कॉन्सिल (MDC) या वैद्यक परिषदेकडे नोंदणी नसलेल्या खाजगी वैद्यकीय व्यावसायीकास बोगस डॉक्टर घोषित करण्यात येईल व त्या डॉक्टरावर नजीकच्या पोलीस स्टेशन मध्ये गुन्हाप दाखल करण्यात येईल. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका व आशा मार्फत संबंधीत क्षेत्रातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे प्रमाणपत्रे जमा करण्यात येणार आहेत. तरी ज्या खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनेमार्फत अद्यापपर्यंत प्रमाणपत्रे जमा केली नाहीत त्यांनी डॉ.सुरेश पंडित वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे जमा करावीत.

या मोहीमेकरिता सर्व खासगी व्यावसायिक यांनी सहकार्य करावे, असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी केले आहे.

# ‘ऑपरेशन सद्भावना’ लोकशाही बळकट करणारा उपक्रम -राज्यपाल राधाकृष्णन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडच्या ऑपरेशन सद्भावना हा उपक्रम भारताच्या लोकशाही मूल्यांना बळकट करणारा आहे. या उपक्रमात सिक्कीम मधील युवक-युवतींच्या सक्रिय सहभागामुळे देशाच्या समावेशक आणि ऐक्यपूर्ण भविष्यासाठी नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.



राजभवन येथे भारतीय लष्कराच्या ईस्टर्न कमांडच्या ऑपरेशन सद्भावना उपक्रमांतर्गत आयोजित नॅशनल इंटीग्रेशन टूर अंतर्गत सिक्कीम विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. मेजर सृजन सिंह नेगी, मेजर आरती रावत, सिक्कीम विद्यापीठाचे १५ विद्यार्थी आणि शिक्षक या वेळी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, सिक्कीममधील विविध गावांतील विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी संवाद साधण्याचा हा विशेष योग माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आहे. मेजर सृजन सिंह नेगी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले पाहिजे. लष्कर केवळ देशाच्या संरक्षणाचे कार्य करत नाही तर राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक समृद्धीसाठी देखील सातत्याने काम करत आहे. देशाच्या विविध भागांतील तरुणांना एकमेकांच्या संस्कृतीशी जोडणाऱ्या या दौऱ्यामुळे सद्भावना, सांस्कृतिक आदान-प्रदान आणि एकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, विद्यार्थ्यांना या उपक्रमामुळे महाराष्ट्राची संस्कृती तसेच येथील भौगोलिक माहिती मिळण्यास मदत होईल. नावीन्यपूर्ण उपक्रम आणि प्रवासाचा अनुभव या विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभराची शिदोरी म्हणून उपयोगी पडेल. विद्यार्थ्यांना संबोधित करताना राज्यपालांनी विविधतेतील एकतेचा संदेश दिला आणि त्यांच्या प्रवासातील अनुभवातून प्रेरणा घेऊन, एकता व सांस्कृतिक वारशाची माहिती या विद्यार्थ्यांना होणार आहे.

राज्यपालांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भारतभूमीसाठी असलेल्या आपल्या सर्वांच्या कर्तव्य आणि जबाबदारी याबद्दल त्यांनी यावेळी सांगितले. तसेच त्यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा अनुभव जाणून घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी राज्यपालांच्या प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे दिली.

सिक्कीम विद्यापीठाचे लॅक्चूम लेक्चा, सोनम लेक्चा, लाका डोमा या विद्यार्थ्यांनी राज्यपालांशी केलेल्या संवादादरम्यान आम्ही आयुष्यात प्रथमच विमान प्रवासाचा अनुभव घेतला आहे.मुंबई अनेकदा चित्रपटांमधून पाहिली होती. पण आज प्रत्यक्ष पाहताना ती खरोखरच भव्य आणि मनमोहक वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. उंच इमारती आणि प्रचंड लाटांचा समुद्र पाहून मन प्रसन्न झाले असल्याचे सांगितले.

या दौऱ्यात आम्हाला राज्यपालांकडून मिळालेले प्रेम, आतिथ्य आणि आपुलकी अत्यंत भावले असून याबद्दल आम्ही आमच्या आईवडील, शिक्षक आणि मित्रांना या अनुभवाबद्दल सांगणार आहोत.

मुंबईतील प्रसिद्ध बाजारात खरेदीचाही अनुभव घेतला. मुंबई विषयी जे काही ऐकले होते, ते प्रत्यक्षात अनुभवता आले. राज्यपालांशी भेट घेण्याची संधी मिळाली, ही आमच्यासाठी अत्यंत गौरवाची गोष्ट आहे, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.महाराष्ट्रातील या दौऱ्यात खूप काही शिकता आले, राजभवन येथील भेटीचा हा अनुभव आमच्यासाठी अविस्मरणीय ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. येथे शिकलेल्या गोष्टी भविष्यात देशसेवेच्या मार्गावर उपयोगी पडतील, असेही त्यांनी सांगितले.

## मतदान यंत्र तपासणी कार्यक्रम सुरू

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी मतदान यंत्रांतील Burnt Memory तपासणी व पडताळणी कार्यक्रम सुरू झाला आहे. हा कार्यक्रम दिनांक २१ जुलै पासून सुरू झाला असून २३ जुलै पर्यंत तीन दिवस चालणार आहे. जिल्हाधिकारी रायगड, किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीमध्ये ही प्रक्रिया पार पाडली जात आहे.



जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, रायगड जिल्हा मध्यवर्ती मतदान यंत्र वेअरहाऊस, शितोळे, पेण येथे ही संपूर्ण प्रक्रिया व्हिडीओ चित्रिकरणद्वारे तपासणी सुरु आहे. दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ७ या वेळेत ही तपासणी केली जात आहे.

या प्रक्रियेमध्ये १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघातील ५ मतदान केंद्रावरील आणि १९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघातील ४ मतदान केंद्रावरील निवडणुकीसाठी वापरण्यात आलेल्या ईव्हीएम मशिन्सच्या Burnt Memory ची पडताळणी सर्व संबंधित निवडणूक उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत बेल कंपनीचे अभियंता यांचे मार्फत केली जात असून, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ही प्रक्रिया पार पाडली जात आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राहणार आहे.

## शेखाडी पुलावर संरक्षण कठडा नाही; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन-दिवेआगर मुख्य मार्गावरील शेखाडी ग्रामपंचायत हद्दीतील अत्यंत महत्त्वाचा पुल सध्या अपघाताच्या उंबरठ्यावर उभा आहे. काही महिन्यांपूर्वी या पुलावरील दोन्ही बाजूंचे संरक्षण कठडे कोसळले असून, सार्वजनिक बांधकाम विभागाचे या गंभीर बाबीकडे सातत्याने दुर्लक्ष सुरू आहे.कठडे नसल्यानं वाहनचालकांना धोका होऊ नये म्हणून स्थानिक महिलांनी पुलाच्या दोन्ही बाजूंना लाकडी काठ्या उभ्या करून त्यावर साडच्या बांधल्या आहेत, जेणेकरून वाहनचालक, विद्यार्थी, आणि पर्यटक यांना समजावे की पुढे कठडा नाही.

या अरुंद पुलावरून काही दिवसापूर्वी दोन मिनी डोअर आणि पर्यटकांचे वाहन घसरून खाली पडले होते. त्या वेळी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, पावसाळ्यात डोंगरावरून जोरात वाहणारे पाणी व समुद्राच्या उधाणाचे पाणी दोन्ही दिशांनी पुलाखालून वाहते, त्यामुळे या ठिकाणी वाहतुकीस उच्च दर्जाचे सुरक्षा उपाय असणे अत्यावश्यक आहे.

शेखाडी येथे सुमारे १० मीटर लांबीचा व ४ मीटर रुंदीचा सिमेंट पाईपवर आधारित पुल सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधला आहे. डोंगर उतारावरून वाहणारे वेगवान पाणी, समोरच असलेला समुद्र किनारा, आणि पुलाशेजारी जिल्हा परिषद शाळा यामुळे या पुलाचे महत्त्व अधिक आहे. मात्र संरक्षण कठडा कोसळून महिन्यांनंतरही दुरुस्ती न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

हा भाग पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा असून, दिवेआगर, श्रीवर्धनमार्गे येणाऱ्या हजारो पर्यटकांसाठीही हा मार्ग महत्त्वाचा आहे. अशा मार्गावर संरक्षण कठड्याशिवाय पुल चालू ठेवणे म्हणजे अपघातांना आमंत्रण देण्यासारखेच आहे. ग्रामस्थांनी स्वतःहून घेतलेली जबाबदारी कौतुकास्पद असली तरी, यंत्रणेचा हलगर्जीपणा मात्र धोकादायक आहे.

**सध्याच्या परिस्थितीत शेखाडी येथील पुलाच्या तात्पुरत्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यासोबतच नवीन व अधिक सुरक्षित पुलाच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र प्रस्ताव समाविष्ट करण्यात आलेला आहे. मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ पुढील कार्यवाही हाती घेण्यात येईल. सार्वजनिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ही बाब गांभीर्याने घेतली जात आहे.**

**-तुषार लुंगे, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, श्रीवर्धन**

## श्री प्रतिष्ठानच्या आरोग्य शिबिराचा विद्यार्थी आणि पालकांनी घेतला लाभ

**माणगाव : बातमीदार**

श्री प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे विद्यालयात सोमवारी (दि. २१) आरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबीराचा ४५ विद्यार्थी व १५ पालकांनी घेतला लाभ



यावेळी भारतीय जनता पार्टीचे माणगाव तालुका चिटणीस राजीव परांजपे, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे गोरेगाव शहर अध्यक्ष सुयश मोने, माजी तालुका उपाध्यक्ष कौस्तुभ वझे, माजी तालुका सरचिटणीस जयेंद्र मुंढे, युवा कार्यकर्ते पार्थ साठे, मुख्याध्यापक गजानन पाटील , शिक्षकवृंद,उपजिल्हा रुग्णालय माणगाव आरोग्य कर्मचारी, गोरेगाव, लोणेरे येथील डॉक्टर्स व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या निमित्ताने विद्यालयात देशी औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली.

विद्यालयातील सर्व विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांची मोफत तपासणी करण्यात आली. त्यांच्या विविध तपासणी करून औषधे देण्यात आली व गरजूंना पुढील उपचारासाठी वालावलकर रुग्णालया येथे सुद्धा पाठवले जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी गोरेगाव पोलिस ठाणे येथील सहा. पोलिस निरीक्षक विजय सुर्वे, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे. डॉ.विनीत पांडे , डॉ.स्नेहल पवार, डॉ.अभिजित कुलकर्णी, साई प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.संदीप भालकें, उपजिल्हा रुग्णालयाचे विशेष सहकार्य मिळाले.

## बँक ऑफ बडोदा बनली ‘निक्षय मित्र’

**रायगड : रामप्रहर वृत**

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात बँक ऑफ बडोदाने आपला मोलाचा सहभाग नोंदवित २० क्षयरुग्णांना दत्तक घेतले आहे. या रुग्णांना नियमित पोषण आहार पुरवून त्यांच्या आरोग्य सुधारणेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याची जबाबदारी बँकेने स्वीकारली आहे.

बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेच्या दिवशी, अलिबाग, रेवदंडा व चणेरा शाखांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक घेतलेल्या क्षयरुग्णांना पोषण आहाराचे वितरण करण्यात आले.जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याआधी सर्व बँक, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट क्षेत्र व अधिकारी वर्गांना ‘निक्षय मित्र’ होण्याचे आवाहन केले होते. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत बँक ऑफ बडोदा ही ‘निक्षय मित्र’ बनली.

दरवर्षी रायगड जिल्ह्यात सरासरी ४ हजार ५०० क्षयरुग्ण आढळतात. त्यांच्यावर प्रभावी उपचारासोबत पोषण आहाराचा पुरवठा झाल्यास उपचार अधिक यशस्वी होतात, हे लक्षात घेऊन जिल्हा क्षयरोग केंद्रामार्फत ‘निक्षय मित्र’ उपक्रम राबविला जात आहे.या उपक्रमाच्या वितरण सोहळ्याला बँक ऑफ बडोदा अलिबाग शाखेचे व्यवस्थापक श्री. चैतन्य मुड, चणेरा शाखेचे व्यवस्थापक श्री. शशिकांत चौगुले, रेवदंडा शाखेचे व्यवस्थापक श्री. श्रीकृष्ण खंदारे, तसेच जिल्हा क्षयरोग केंद्राचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर





या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी विविध ठिकाणी आयोजित रक्तदान शिबिरांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व रक्तदात्यांना प्रेरणा व शुभेच्छा दिल्या. या उपक्रमात शेकडो रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीची जाणीव दाखवून दिली. सर्व रक्तदात्यांना ब्लड डोनेट कार्ड आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

पनवेल येथील शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक गणेश कडू, मनोहर म्हात्रे, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, ‘दिबां’चे चिरंजीव अतुल पाटील, कर्णा शेलार, माजी रामेश्वर आंग्रे, रमेश पाटील, राजेश गायकर, भाजपच्या शहर अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज- म्हात्रे, सुरेखा मोहोकर, जॉनी जॉर्ज, सारिका भगत, कोमल कोळी, सुरेश वास्कर, परमेश्वर गिरे, अमरीश मोकल, सतीश पाटील, अनेश ढवळे, राजेश भोईर, निलेश दराडे, रामा मोरबाळे, विनायक मुंबईकर, देवांशू प्रबाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

पनवेल उत्तर मंडलाचे रक्तदान शिबिर रामशेठ ठाकूर महाविद्यालय पेठगाव येथे, खारघर शहर मंडल शिबिर रामशेठ ठाकूर स्कुल खारघर येथे, कामोठे शहर मंडल शिबिर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय कामोठे येथे, कळंबोली शहर मंडल शिबिर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय कामोठे येथे, पनवेल शहर मंडल शिबिर भाजप मध्यवर्ती कार्यालय पनवेल येथे, नवीन पनवेल मंडलाचे शिबीर रोटरी ब्लड बँक खांदा कॉलनी तर पनवेल पूर्व मंडलाचे शिबीर सेंट अँड्र्यू स्कुल आकुर्ली येथे पार पडले.

***महाराष्ट्र राज्य देशाच्या शाश्वत प्रगतीचा गतीचक्र आहे. आणि या गतीला दिशा देणारे नेतृत्व म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सारथ्य करत आहेत. अचूक निर्णय क्षमता त्यांच्याकडे आहे. त्यामुळे कार्यकर्ता म्हणून त्यांचा प्रवास ’राष्ट्रप्रथम’ या तत्वाशी एकनिष्ठ राहून संकल्पपूर्ण नेतृत्वात झाला आहे. त्यांच्या प्रत्येक निर्णयात सामान्य माणूस केंद्रबिंदू राहिला आहे.***

***-आमदार प्रशांत ठाकूर***

## बोरघाटात ट्रकची कारला धडक

या अपघातात कारमधील महिला संध्या शंकर घोरपडे यांचा जागीच मृत्यू झाला तर चालक बाबू चंद्रकांत जाधव, विद्या बाळू जाधव, बाबू चंद्रकांत जाधव, अवण्या बाबू जाधव (रा. सर्व घोडे भारूड महाबळेश्वर) हे गंभीर जखमी झाले आहेत. या अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस, हेल्प फाउंडेशनचे सदस्य आयआरबी टीम तात्काळ घटनास्थळी दाखल होत कार मधील अडकलेल्या जखमींना बाहेर काढून तात्काळ खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेत.



# मुंबई मराठी पत्रकार संघात आता नाटकाची तिसरी घंटा वाजणार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात आता नाटकाची तिसरी घंटा वाजणार आहे. महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीला प्रोत्साहन देण्यासाठी ‘नाट्य शुक्रवार’ या अभिनव उपक्रमाची घोषणा मंगळवारी मुंबई मराठी पत्रकार संघाततर्फे करण्यात आली.



या उपक्रमाअंतर्गत, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात दर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी महाराष्ट्रातील दर्जेदार प्रायोगिक नाट्याचे मोफत सादरीकरण होणार आहे. नवोदित व प्रायोगिक रंगकर्मींसाठी हे व्यासपीठ खुले असणार असून, नाट्यप्रेमींना नाट्यप्रयोगांचा निःशुल्क आनंद घेण्याची संधी यातून मिळणार आहे.

लोकमान्य सभागृहात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, विश्वस्त देवदास मटाले, दिग्दर्शक आणि अभिनेते रविंद्र देवधर, पत्रकार संघाचे कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, पत्रकार नयना रहाळकर उपस्थित होते.

येत्या २५ जुलै २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता ‘नाट्य शुक्रवार’ उपक्रमाचे उद्घाटन होणार आहे. ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे, संजय मोने, दिग्दर्शक-लेखक मिलिंद पेडणेकर आणि इंडियन ऑईलचे कॉर्पोरेट कम्युनिकेशनचे महाव्यवस्थापक डॉ. अभिषेक कुमार यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा रंगणार आहे.

‘मराठी प्रायोगिक रंगभूमीला बळ देणं आणि नव्या प्रयोगशील नाटकांना मंच मिळवून देणं, हा ‘नाट्य शुक्रवार’ उपक्रमाचा मूळ हेतू आहे. पत्रकार संघ केवळ पत्रकारांसाठीच नव्हे तर समाजातील उपक्रमशील घटकांसाठीही एक प्रेरणास्थान असावं, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.’ या उपक्रमाला ‘इंडियन ऑईल’चे प्रायोजकत्व लाभल्याचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी सांगितले.

## खोपोली भाजपतर्फे छत्रीवाटप कार्यक्रम

**खोपोली:** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून खोपोली भाजप मंडळ तर्फे शिळफाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर प्रांगणात छत्री वाटपाचा कार्यक्रम मंगळवारी सायंकाळी संपन्न झाला. युवा उद्योजक विक्रम साबळे यांच्या माध्यमातून हा छत्री वाटपाच्य कार्यक्रमाला महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे, माजी नगरसेवक अविनाश तावडे चंद्राप्पा अनिवार, कामगार नेते राम पवार इत्यादी सह भारतीय जनता पक्षाचे सर्व खोपोली मंडल चे कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या यावेळी उपस्थित होत्या.



**दुखवटा**

## परशुराम पाटणकर



**खोपोली :** वरची खोपोली भागातील ज्येष्ठ नागरिक, शासनाच्या शेतकी खात्यातील माजी कर्मचारी व ॲडवोकेट श्रीकांत पाटणकर यांचे वडील परशुराम गंगाधर पाटणकर (८७) यांचे सोमवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे, पंतवंडे असा परिवार आहे.

# पनवेल परिसरात आगीच्या घटना

## करंजाडे येथे इमारतीच्या मीटर बॉक्सला जळाला

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे, सेक्टर-४ येथील जानकी अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक ६८ येथे तळमजल्यावरील मीटर बॉक्सला अचानक मोठी आग लागल्याची घटना घडली, मात्र येथील नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे आणि येथे मोठा अनर्थ टळल्याचे तसेच या घटनेत सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



प्राप्त माहितीनुसार येथे आग लागल्याची माहिती मिळताच येथील रहिवाशांनी तत्काळ इमारतीतील सर्व नागरिकांना सुरक्षितरीत्या बाहेर काढले. त्यानंतर फायर एक्स्टिंग्विशरच्या साह्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला आणि महावितरण (एमएसईबी) कर्मचाऱ्यांना याची

पनवेल मनपा अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून प्राथमिक सुरक्षात्मक उपाययोजना केल्या. यावेळी त्यांनी कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट केले. विद्युत मीटर बॉक्समध्ये शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार आणि ज्येष्ठ नेते कर्णा शेलार यांनी घटनास्थळी धाव घेतली.

सरपंच मंगेश शेलार यांनी तातडीने महावितरण कार्यालयाशी संपर्क साधून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचा आग्रह धरला. दरम्यान, रहिवाशांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अनुचित घटना घडली नसल्याचे सांगण्यात आले.

## खारघरमध्ये चायनीजच्या दुकानाला लागली आग

**पनवेल : वार्ताहर**

सायन पनवेल हायवे रोड सेक्टर १ खारघर रेल्वे स्टेशनच्या समोर एका चायनीजच्या दुकानाला आग लागली होती. या दुकानाचे शटर उघडून शोरमा मशीनमध्ये पेटलेला एलपीजी गॅस सिलेंडर बाहेर काढून त्याची आग विझवली तसेच दुकानांमध्ये इतर वस्तूंना लागलेली आग पूर्णपणे विझवली.

आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे केंद्र अधिकारी सौरभ पाटील,अग्निशमन प्रणेता प्रशांत दरेकर, यंत्रचालक आर एल बंडा, फायरमन संभाजी पाटील, फायरमन गणेश भोईर. फायरमन एन जे मढवी, फायरमन बी व्ही भोसले आदींनी आगीवर नियंत्रण मिळविले. दुकानामधून दोन भरलेले दोन रिकामे असे एकूण चार एलपीजी सिलेंडर बाहेर काढण्यात आले आणि ही आग पूर्णपणे विझवली.



# कोपर येथे रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल पश्चिम मंडळ आणि सरस्वती एज्युकेशन सोसायटी संचालित रायगड हॉस्पिटल ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला माजी खासदार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या उदात्त संदेशाखाली हे शिबिर भारतीय जनता पक्षाचे पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ यांनी आयोजित केले होते. कोपर येथील आर-फोर मधील स्वयंभू गणेश मंदिरात आयोजित या शिबिरात १००हून अधिक रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील, कारंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, कर्णा शेलार, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, गजानन पाटील, प्रकाश पाटील, रमेश पाटील, राकेश गायकवाड, सदाशिव वास्कर, मंखुश नाईक, निलेश खारकर, हेमंत ठाकूर, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, प्रकाश पाटील, धीरज ओवळेकर, अमर पाटील, प्रकट कडू, ॲड. निलेश हातमोडे, रूपेश गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





## कळंबोली-रोडपाली येथे किराणा दुकान जळून खाक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कळंबोली येथील रोडपाली परिसरात सोमवार २१ जुलै रात्री ११:३० च्या सुमारास पाटील डेअरी या किराणा मालाच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत संपूर्ण दुकान जळून खाक झाले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दुकान बंद झाल्यानंतर काही तासांतच आगीचे लोळ अचानक उसळले. येथे लागलेली आग परिसरातील नागरिकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळवले. घटनास्थळी पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या व आग आटोक्यात आणण्यात यश आले.

या आगीत दुकानातील किराणा माल, डेअरी उत्पादने, स्टोरेज यंत्रणा आणि इतर साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. या आगीत अंदाजे १० ते १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

## एमएनएम विद्यालयात मनशक्ती प्रयोग केंद्र कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विज्ञानाच्या आधारावर सामाजिक कार्य करणाऱ्या मनशक्ती प्रयोग केंद्र लोणावळा यांच्या स्वर्ण जयंती वर्षा निमित्त जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



आजच्या गतिशील, आधुनिक जीवनामध्ये आहार - विहार दिनचर्या, धावपळ, प्रदूषण, असुरक्षितता, स्पर्धा यामुळे सर्वांगीण ताण तणाव वाढत आहेत. आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थी देखील प्रचंड ताणतणावाला सामोरे जात आहेत तरी तणाव मुक्त वातावरणात विद्यार्थ्यांनी आपला पाठ्यक्रम, व्यक्तिमत्व विकास, वेळेचे व्यवस्थापन, परीक्षेमध्ये यश मिळवण्यासाठी योग्य पद्धतीने अभ्यास तसेच ध्यानधारणा यांचा मिलाफ करत यश मिळवता येते याबद्दल ध्यानधारणा केंद्राच्या मार्गदर्शिका राजेश्री अंग्रे व विभा मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

शाळेच्या प्राथमिक आणि माध्यमिक विभागाच्या शिक्षकांसाठी देखील स्वतंत्र कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले कार्यशाळेला माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या साडेचारशे विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी तणावमुक्त वातावरणात शिक्षण व वैयक्तिक तणाव व्यवस्थापन ध्यानधारणा याबद्दल माहिती सांगण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी कार्यशाळेला भेट देत शुभेच्छा दिल्या.

# उलवेमध्ये जनता संवाद कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या आशीर्वादाने व चाणक्य परिवाराचे संस्थापक ॲड. सुनील मौर्या यांच्या संकल्पनेतून उलवेमधील चाणक्य कार्यालय येथे पहिल्यांदाच जनता संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या संवाद कार्यक्रमात वहालचे माजी उपसरपंच व गव्हाण जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



कार्यक्रमात उल्वेतील स्थानिक नागरिकांनी अमर म्हात्रे यांना विविध समस्या व प्रश्न विचारले. या सर्व प्रश्नांना म्हात्रे यांनी अत्यंत संयमाने व स्पष्टपणे उत्तरे देत समाधानकारक स्पष्टीकरण दिले. नागरिकांना थेट संवादाची संधी मिळाल्याने समाधान व्यक्त झाले.

या वेळी चाणक्य परिवाराचे संस्थापक ॲड. सुनील मौर्या यांनी सांगितले की, ही उल्वेमधील पहिली जनता संवाद बैठक आहे. यापुढे दर महिन्याला अशा बैठका घेण्यात येतील. विविध क्षेत्रातील पदाधिकारी, अधिकारी यांना आमंत्रित करून नागरिकांच्या अडचणी थेट मांडल्या जातील, जेणेकरून प्रश्नांचे समाधान त्वरेने करता येईल.

या उपक्रमास हम हिंदुस्तानी ग्रुपचे संस्थापक समर्थ सोलंकी, उज्ज्वल फाउंडेशनचे देवालय मित्रा, गोविंद भट्ट, तात्या बिरादर, सभाजीत पटेल, विक्रमजीत सिंह, रजनीश पटेल यांच्यासह चाणक्य नारायणी शक्तीच्या महिला सदस्यांमध्ये मंजू सोलंकी, पुष्पा भट्ट व कामिनी भगत यांनी सक्रिय सहभाग घेतला.



**कामोठे : येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये ट्रान्सपोर्ट कमिटीच्या बैठकीत विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम आणि अपघाताचे परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.**

# दिघाटी येथे शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील दिघाटी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी विविध शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला जातो. त्यानुसारे दिघाटी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या वह्यांचे वाटप मान्यवारांचे हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास रायगड जिल्हा सरचिटणीस व माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, भाजपचे पनवेल तालुका दक्षिण अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती संतोष पाटील, पनवेल पंचयात समितीचे उपसभापती व माजी रायगड जिल्हा परिषद सदस्य जिवन म्हात्रे, दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर, माजी सरपंच भाऊ कृष्णा ठाकूर, मा. उपसरपंच दत्तात्रेय पाटील, जेष्ठ नेते चांगाजी पाटील, हिरामण पाटील, रघुनाथ ठाकूर, केळवणे पंचयात समिती विभागीय युवा मोर्चा सुबोध ठाकूर, शाळा कमिटी अध्यक्ष विकास पाटील, शाळा कमिटी सदस्या शुंभागी ठाकूर, गजानन पाटील, आदित्य ठाकूर, गणेश पाटील, अतिश पाटील, शाळाचे शिक्षक व कमिटी व भाजपचे पदादिकारी आणि भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# इनरव्हील क्लबचा पदग्रहण सोहळा संपन्न; शुभांगी पिंपळकर क्लबच्या नूतन अध्यक्षा







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी एक जुलै नंतर इनरव्हील क्लबचे नवीन वर्ष सुरू होते आणि नवीन प्रेसिडेंटचा पदग्रहण सोहळा पार पडतो. याला अनुसरून सन २०२५-२६ या वर्षासाठी शुभांगी शिरीष पिंपळकर यांची इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा म्हणून तसेच डॉक्टर सौ अमृता सुमुख नाईक यांची सचिव म्हणून सर्वानुमते निवड झाली. त्यानुसार त्यांचा पदग्रहण सोहळा दिमाखात पार पडला.

या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३१३ च्या डिस्ट्रिक्ट चेअरमन पनवेलच्या प्रसिद्ध गायनाकॉलॉजीस्ट डॉक्टर शोभना शैलेश पालेकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचा शुभारंभ दीप प्रज्वलन तसेच इनरव्हील प्रार्थनेने झाला. यानंतर माजी अध्यक्ष डॉक्टर विणा निखिल मनोहर यांनी गतवर्षी केलेल्या कामाचा आढावा घेतला. आणि नूतन अध्यक्षा शुभांगी पिंपळकर यांच्याकडे पदभार सोपविला.

यावर्षी खजिनदार म्हणून अवंतिका मारूलकर, आय एस ओ शिल्पा चंदने, एडिटर म्हणून वर्षा ठाकूर तसेच सीपीसी म्हणून सुलभा निंबाळकर यांची नेमणूक झाली आहे. या वेळी करुणेश्वर वृद्धाश्रमाला धान्य वाटपाचा प्रोजेक्ट करण्यात आला.

हा प्रोजेक्ट क्लब च्या सिंधुताई सपकाळ या ग्रूप ने स्पॉन्सर केला होता, कार्यक्रमाच्या शेवटी व्हाईस प्रेसिडेंट संयोगिता बापट यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता माजी व्हॉइस प्रेसिडेंट वंदना लघाटे यांनी गायलेल्या पसायदानाने झाली.

## संपादकीय

# नव्या उपराष्ट्रपतींकडे लक्ष

देशाचे चौदावे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सोमवारी प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणामुळे पदाचा राजीनामा दिला. हा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारला असून त्यामुळे आता उपराष्ट्रपती पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी लागण्याची शक्यता आहे.

**संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाल्याच्या पहिल्याच दिवशी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणास्तव आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिल्याने तर्कवितर्कांना उधाण येणे साहजिक आहे. उपराष्ट्रपती हेच राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. गेली तीन वर्षे धनखड यांनी राज्यसभेचे कामकाज अत्यंत उत्तम प्रकारे पार पाडले. सर्वच पक्षांशी त्यांचे सौहार्दाचे संबंध राहिले. त्यांची शिस्त करडी होती, पण त्यामुळे त्यांनी सभागृहामध्ये कटुता येऊ दिली नाही. समाजवादी पक्षाच्या खासदार श्रीमती जया बच्चन यांच्याशी त्यांचे एक-दोनदा चांगले सवालजवाब झडले होते हे लोकांना आठवत असेल. श्रीमती बच्चन यांच्यासारख्या उग्र स्वभावाच्या महिला सदस्याचीही निवृत्तीच्या सुमारास प्रसन्न वदनाने पाठवणी करणारे धनखड नेहमीच सगळ्यांच्या लक्षात राहतील. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी राजीनामा दिला असला तरी दिल्लीच्या राजकीय वर्तुळामध्ये त्याविषयी अनेक प्रकारच्या कुजबुजी चालू झाल्या आहेत. उपराष्ट्रपतींनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची ही स्वतंत्र भारताच्या आजवरच्या इतिहासातील तिसरी घटना म्हणावी लागेल. यापूर्वी १९६९ साली व्ही. व्ही. गिरी यांनी आणि आर. वेंकटरमण यांनी १९८७ साली उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला होता. तथापि गिरी आणि वेंकटरमण यांच्या राजीनाम्याची कारणे वेगळी होती. तत्कालीन पंतप्रधान तसेच त्यांच्या पक्षाच्या संमतीने राष्ट्रपती पदाची निवडणूक लढवण्यासाठी त्यांनी राजीनामे दिले होते. अर्थात ठरल्याप्रमाणे निवडणूक जिंकून त्यांची प्रतिष्ठापना राष्ट्रपती पदी झाली देखील. धनखड यांच्या राजीनाम्याची तुलना त्यांच्याशी होऊ शकत नाही. कारण त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव विश्रांती घेण्याचे ठरवले आहे. धनखड यांचा कार्यकाळ २०२७ पर्यंत होता. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दरम्यान मार्चमध्ये छातीत दुखू लागल्यामुळे त्यांना एम्स रुग्णालयात भरती करण्यात आले होते. उपचारानंतर ते सक्रिय झाले खरे. सोमवारीदेखील त्यांनी राज्यसभेचे कामकाज व्यवस्थित चालवले. आपल्या राजकीय कारकीर्दीत जनता दलापासून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसपर्यंत अनेक लहानमोठ्या पक्षांमध्ये धनखड यांनी थोडा-थोडा काळ व्यतीत केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी धनखड यांचे राजकीय गुण ओळखून त्यांची २०१९ मध्ये पश्चिम बंगालच्या राज्यपाल पदी नियुक्ती केली होती. राज्यपाल पदी असताना धनखड यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची डाळ मुळीच शिजू दिली नव्हती. मोदी सरकार आणि उपराष्ट्रपती धनखड यांच्यामध्ये ताळमेळाचा अभाव जाणवू लागल्याने हा तडकाफडकी निर्णय धनखड यांना घ्यावा लागला असावा अशी कुजबुज दिल्लीदरबारी सुरू आहे, परंतु त्यात अजिबात तथ्य नसावे. कारण धनखड यांनी उत्तम प्रकारे कामगिरी बजावून राज्यसभेचे कामकाज सक्षमतेने चालवले होते. धनखड यांच्या राजीनाम्यामुळे आता उपराष्ट्रपती पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी लागणार हे उघड आहे. लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील सदस्य या निवडणुकीतील मतदार असतील. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत राज्यांमधील आमदारांचे मत देखील जमेस धरले जाते. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मात्र खासदारकी हीच मतदानाची पात्रता मानली जाते. धनखड यांच्या राजीनाम्यानंतर देशाचे नवे उपराष्ट्रपती कोण होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.**

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष सर्वसामान्यांचा आधार

मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना संबधीत रुग्णालयामार्फत अर्थिक सहाय्य देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात सदर अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असल्याने नागरीकांना या सेवा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दि.०१ मे २०२५ रोजी औपचारिक उद्घाटन करुन सुरु करण्यात आलेला आहे. यामुळे राज्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी प्रत्येक जिल्हयातच जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती सहज उपलब्ध, संलग्न रुग्णालयाची यादी, अर्ज आणि पाठपुराव्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज नाही तसेच अर्ज स्विकृती व सध्यस्थिती इत्यादी मदत पुरवली जाणार आहे.




**मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष रायगड जिल्ह्यातील रुग्णालयांची नावे.**

१) आधार मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आणि आयसीयू, जुने पनवेल,७ अ, पहिला मजला, गुरुकृपानगर कॉम्प्लेक्स, पनवेल. २) आदित्य नर्सिंग होम, महाड, रायगड,दस्तुरी नाका, रायगड रोड, महाड, जि. रायगड. ३) अक्का हॉस्पिटल प्रा. लि. रायगड, ९९९ बाळ सावंत एसएमएस पेट्रोल पंपासमोर, ४) अलिमा डायलिसिस सेंटर रायगड,गणपतीबप्पा बिल्डिंग, कल्याण नाका, पनवेल. ५) भांडारकर चिल्ड्रन्स क्लिनिक न्यू पनवेल,मधुर मिलन बिल्डिंग, पहिला मजला, सेक्टर ५पनवेल. ६) बिस्मिल्ला हॉस्पिटल पनवेल,पद्मा नगर, पनवेल. ७) चिरायु चिल्ड्रन्स हॉस्पिटल न्यू पनवेल, शुभारंभ बिल्डिंग, पनवेल. ८) डॉक्टर हॉस्पिटल पनवेल रायगड, पनवेल, रायगड, ९) डॉ. ए. ए. देशमुख हेल्थ फाउंडेशन रायगडख महाड, रायगड. १०) डॉ. मोहितेस अयुम मेडिकल फाउंडेशन न्यू पनवेल,सेक्टर १६, शिवाजी मार्ग, अश्विनीनगर न्यू पनवेल, नवी मुंबई, ११) डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय पनवेल,१९६/१, पनवेल, १२) डॉ. पुष्पक शिंदे हॉस्पिटल, रायगड, मोहोत ऑर्टिक गली, न्यू नार्गार्द, पालिका बिल्डिंग, १३) जिजामाता हॉस्पिटल उरण रायगड, यू उपाशी खारफाटा, ता.उरण, रायगड. १४) श्रावणी ब्रेन अँड स्पाईन सेंटर आणि ऑर्थोपीडिक हॉस्पिटल अणुसया पनवेल,अणुसया हॉस्पिटलजवळ, पनवेल, १५) लाईफ केअर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल अँड आयसीयू पनवेल अशोक नगर, प्लॉट क्र. ३, खांदा कॉलनी, रायगड. १६) लाईफलाईन हॉस्पिटल मेडिकल अँड रिसर्च सेंटर पनवेल रायगड,सी ४, साई नेशनल हायवे चार, नवीन पनवेल रायगड. १७) माधवबाबा आयुर्वेद कार्डिअक रिहॅब सेंटर, रायगड, १७१८/८४, से. ८ वॉर्ड, सारथी मेडिकल, खोपोली. १८) मेहर मॅटरनिटी हॉस्पिटल माणगाव मोरबा रोड माणगाव रायगड. १९) मंगला नर्सिंग होम आणि कॅन्सर हॉस्पिटल, रायगड, मु. उंबके फाटा, ता. पेण, जि. रायगड. २०) मनिराज ईएफसी हॉस्पिटल, न्यू पनवेल,शॉप नं. १६/२, निकुंज सदन, सेक्टर १०, खांदा कॉलनी, न्यू पनवेल. २१) मातोश्री मल्टिस्पेशालिटी पनवेल,प्लॉट क्र २८ बी, शिवाजी सेक्टर ३, खांदा कॉलनी, न्यू पनवेल. २३ मनेषा ऑक्सिजन हॉस्पिटल, रायगड,कोसा-मुळा, रायगड, २४) निकम परमार हॉस्पिटल अँड इन्स्टिट्यूट केअर युनिट रायगड.ए विंग गुल अपार्टमेंट, न्यू उरण रोड, पंचवटी हॉटेल जवळ, पनवेल रायगड. २५) निरामय हॉस्पिटल जुने पनवेल रायगड.प्लॉट नं. २१, अठ्ठावीस मिडल क्लास सोसायटी रोड, शिवाजी चौक, जुने पनवेल, रायगड. २६) निरामय हॉस्पिटल पेण खोपोली रायगड शंकर नगर, कोबंडपाडा, पेण खोपोली रोड, रायगड. २७) पाडळकर हॉस्पिटल अँड सीआययू नवी पनवेल,एक्सेल पाम ग्रीन इन्क्लेव्ह बिल्डिंग, प्लॉट नं. १, सेक्टर १, खांदा कॉलनी, नवी पनवेल. २८) प्राचिन हेल्थकेअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल रायगड,प्लॉट नं. १०७, दोन हॉटेल गार्डनच्या मागे, पनवेल, रायगड. २९) प्राचिन हेल्थकेअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, पनवेल,प्लॉट नं. ६९/२, हॉटेल गार्डन जवळ, पनवेल. ३०) पुरोहित क्लिनिक पनवेल,प्लॉट नं. १००, साई सोसायटी, पनवेल, रायगड. ३१) आर एस एस जनकल्याण समिती, रायगड, ३२) सेलार हॉस्पिटल अँड आयसीयू,तुळशी प्रेमा सीएचएस, खांदा कॉलनी, नवी मुंबई, ३३) सुखम हॉस्पिटल पनवेल,जसबंदवाला कॉम्प्लेक्स, विष्णुजी नाका, जुने पनवेल, ३४) सुमितराज हॉस्पिटल खोपोली रायगड,शांतीनगर, खोपोली, रायगड, ३५) सुपाकेअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, रायगड,पहिला मजला, सत्य सिपिएस लि., सेक्टर २ ई, कळंबोली, रायगड, ३६) उत्रती हॉस्पिटल अँड आयसीयू पनवेल रायगड,जे. के. प्लाझा, शिवाजी चौक, पनवेल,३७) वीर हॉस्पिटल अँड आयसीयू न्यू पनवेल,नील अनंतेवळा इमारत, दुसरा मजला, सेक्टर १७, खांदा कॉलनी, न्यू पनवेल पश्चिम

-संकलन जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग

**(भाग-२)**

# क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद

चंद्रशेखर तिवारी, ज्यांना चंद्रशेखर आझाद म्हणून ओळखले जात असे,त्यांचा जन्म २३ जुलै १९०६, भाब्रा आता मध्य प्रदेश येथे झाला ते एक भारतीय क्रांतिकारी नेते आणि स्वातंत्र्यसैनिक होते.

किशोरावस्थेतच त्यांनी घर सोडले आणि बनारस येथील संस्कृत शाळेत शिक्षण घेतले. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ते भारतीय राष्ट्रीय चळवळीत ओढले गेले आणि महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत भाग घेतला. निदर्शनांना हजेरी लावली आणि वयाच्या १५ व्या वर्षी पोलिसांनी त्यांना अटक केली आणि दंडाधिकाऱ्यांसमोर आणले. त्याने अधिकाऱ्यांना त्याचे नाव आझाद त्याच्या वडिलांचे नाव स्वतंत्र आणि पत्ता तुरुंग असे सांगितले. तो तरुण असल्याने तुरुंगातून सुटला परंतु पोलिसांनी त्याला जबर मारहाण केली.त्यानंतर त्याने आझादच्या बाजूने आपले आडनाव सोडले आणि कधीही जिवंत पकडले जाणार नाही असा निर्धार केला.त्यांना भारतीय लोकांमध्ये लोकप्रियता मिळाली.

चौरी चौरा येथे क्रांतिकारी जमावाने अनेक पोलिसांची हत्या केल्यानंतर, फेब्रुवारी १९२२ मध्ये गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केल्याने आझाद निराश झाले. स्वदेशी चळवळीदरम्यान उदयास येणाऱ्या अतिरेकी राष्ट्रवादाचा स्वीकार आझादने केला आणि अतिरेकी मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्याचा पुरस्कार केला.

हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल आणि पक्षाचे तीन प्रमुख नेते, रोशन सिंग, राजेंद्र नाथ लाहिरी आणि अशफाकुल्ला खान यांच्या मृत्युनंतर, त्यांनी हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनची पुनर्रचना हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या नवीन नावाने केली.काही काळासाठी, आझादने झाशीला त्याच्या एचआरए संघटनेचे मुख्यालय बनवले.झाशीपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या ओरछाच्या जंगलात नेमबाजीचा सराव करत आणि एक तज्ञ निशानेबाज म्हणून इतर सदस्यांनाही शिकवत असे.

बराच काळ ते पंडित हरिशंकर ब्रम्हचारी या टोपण नावाने सातार नदीच्या काठावरील हनुमान मंदिराजवळील झोपडीत राहत होते.

काकोरी ट्रेन दरोडा (१९२५). काकोरी कट रचणाऱ्यांपैकी आझाद हा एकमेव पळून गेला. तो झाशीला पळून गेला, जे १८५७ च्या भारतीय बंडाचे एक केंद्र होते, राणी लक्ष्मीबाई यांच्या नेतृत्वाखाली पळून गेलेला आझाद झाशीत तीन वर्षांहून अधिक काळ राहिला असे मानले जाते, ओरछाच्या जंगलात नेमबाजीचा सराव करत पोलिसांनी घेरल्यानंतर बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग न मिळाल्याने, चंद्रशेखर आझाद यांनी २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबादमधील आझाद पार्क मध्ये स्वतःवर गोळी झाडून घेतली. त्यात त्यांचा मृत्यु झाला

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### बीएमडब्ल्यूची सर्वात स्वस्त कार भारतात लाँच

बीएमडब्ल्यू इंडियाने भारतीय बाजारात बीएमडब्ल्यू २ सिरीज ग्रॅन कूपचे अपडेटेड मॉडेल लाँच केले आहे. दुसऱ्या पिढीची ही कार सध्याच्या मॉडेलपेक्षा मोठी आहे आणि नवीन वैशिष्ट्यांनी सुसज्ज आहे. सुरक्षेसाठी ट्रॅक्शन कंट्रोल आणि लेव्हल-२ अडास सारखी वैशिष्ट्ये आहेत.



कंपनीने ही कार २१८एम स्पोर्ट आणि २१८एम स्पोर्ट प्रो या दोन प्रकारांमध्ये सादर केली आहे. तिची एक्स-शोरूम किंमत ४६.९० लाख रुपये ठेवण्यात आली आहे. ही कंपनीची सर्वात स्वस्त कार आहे. तिची बुकिंग आणि डिलिव्हरी सुरू झाली आहे. ती मर्सिडीज-बेंझ ए क्लासशी स्पर्धा करते. कंपनीने ही कार २१८एम स्पोर्ट आणि २१८एम स्पोर्ट प्रो या दोन प्रकारांमध्ये सादर केली आहे. तिची एक्स-शोरूम किंमत ४६.९० लाख रुपये ठेवण्यात आली आहे. ही कंपनीची सर्वात स्वस्त कार आहे. तिची बुकिंग आणि डिलिव्हरी सुरू झाली आहे. ती मर्सिडीज-बेंझ ए क्लासशी स्पर्धा करते.रायडिंगसाठी, यात १८-इंच ड्युअल-टोन अलॉय व्हील्स आहेत आणि फ्रेमलेस दरवाजे अधिक प्रीमियम दिसतात आणि कूपसारखे फील देतात. मागील बाजूस, स्पोर्टी टचसाठी पातळ रॅपअराउंड एलईडी टेललाइट्स आणि बंपरवर काळे अ‍ॅक्सेंट आणि लाल रिफ्लेक्टर आहेत.

इंटिरिअर: २ सिरीज ग्रॅन कूपच्या केबिनमध्ये सॉफ्ट-टच मटेरियल वापरले आहे. त्यात दोन केबिन थीम्सचा पर्याय आहे: ऑयस्टर (बॅज) आणि मोक्का. डॅशबोर्डवर एक मोठा वक्र डिस्प्ले आहे, ज्यापैकी एक टचस्क्रीन इन्फोटेनमेंट सिस्टम आहे आणि दुसरा डिजिटल इन्स्ट्रुमेंट क्लस्टर आहे.

ड्रायव्हर आणि पुढच्या प्रवाशासाठी फ्रंट एअरबॅग्ज, फ्रंट आणि रिअर सीटसाठी साइड एअरबॅग्ज आणि हेड एअरबॅग्ज, जे सर्व प्रकारच्या अपघातांमध्ये सुरक्षितता प्रदान करतात.

अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम ब्रेकिंग दरम्यान चाके लॉक होण्यापासून रोखते, ज्यामुळे वाहन नियंत्रणात राहते.


डायनॅमिक स्टॅबिलिटी कंट्रोल वाहन घसरण्यापासून रोखते, विशेषतः ओल्या रस्त्यांवर किंवा तीव्र वळणांवर.

ट्रॅक्शन कंट्रोल: चाके घसरण्यापासून रोखते, त्यामुळे वाहनाची पकड सुधारते तीक्ष्ण वळणांवर ब्रेक लावताना वाहन स्थिर ठेवते.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हे वाक्य ऐकल्यावर बाळ गंगाधर टिळक आठवतात, लोकमान्य ही पदवीही त्यांना देण्यात आली होती . लोकमान्य म्हणजे लोकांनी स्वीकारलेला नेता. लोकमान्यांशिवाय त्यांना हिंदू राष्ट्रवादाचे जनक देखील म्हटले जाते.

ते भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील पहिले लोकप्रिय नेते बनले. ते हिंदू म्हणून ओळखले जात होते. त्यांना राष्ट्रवादाचे जनक देखील म्हटले जाते. बाळ गंगाधर टिळक हे ब्रिटीश राजवटीत स्वराज्याचे पहिले आणि खंबीर पुरस्कर्ते मानले जातात. त्या काळात त्यांनी मराठी भाषेत नारा दिला, त्यांचा मराठी भाषेत दिलेला नारा आहे. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच खूप प्रसिद्ध झाला. त्यांनी बिपिन चंद्र पाल, लाला लजपत राय, अरविंद घोष, व्ही.ओ. चिदंबरम पिल्लई आणि मुहम्मद अली जिना यांच्यासह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक नेत्यांशी घनिष्ठ युती केली.



**निमित्त**

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात झाला. रत्नागिरी गावातून आधुनिक महाविद्यालयात शिक्षण घेतलेले ते भारतीय पिढीतील पहिले सुशिक्षित नेते होते. त्यांनी काही काळ शाळा-महाविद्यालयांमध्ये गणित शिकवले. ते इंग्रजी शिक्षणाचे टीकाकार होते. यामुळे ते भारतीय सभ्यतेचा अनादर शिकवते, असा त्यांचा समज होता. भारतातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दिशेनेही बरेच काम झाले आहे.त्यांनी इंग्रजीत मराठा दर्पण आणि मराठीत केसरी नावाची दोन दैनिके सुरू केली, टिळकांनी ब्रिटीश राजवटीच्या क्रौर्याबद्दल आणि भारतीय संस्कृतीच्या न्यूनगंडावर टीका केली होती. ब्रिटीश सरकारने ताबडतोब भारतीयांना पूर्ण स्वराज्य द्यावे, अशी त्यांची मागणी होती. केसरी या वृत्तपत्रात ते इंग्रजांविरुद्ध अतिशय आक्रमक लेख लिहीत असत. या लेखांमुळे त्यांना अनेकवेळा तुरुंगात पाठवण्यात आले. त्यांच्या 'केसरी' या पत्रात 'देशाचे दुर्दैव' असा लेख लिहिला होता, त्यात ब्रिटिश सरकारच्या धोरणांना विरोध करण्यात आला होता. यामुळे, त्यांना ७ जुलै १८९७ रोजी देशद्रोहासाठी अटक करण्यात आली. त्यांना मंडाले (ब्रह्मदेश) तुरुंगात ६ वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली.त्यांची शिक्षा पूर्ण होण्यापूर्वीच त्यांच्या पत्नीचे निधन झाले. कारागृहातील एका पत्रावरून त्यांना ही बातमी कळली. ब्रिटीश सरकारच्या तुघलकी धोरणामुळे त्यांना त्यांच्या मृत पत्नीचे शेवटचे दर्शनही घेता आले नाही.

१९०८ मध्ये टिळकांनी क्रांतिकारक प्रफुल्ल चाकी आणि खुदीराम बोस यांच्या बॉम्ब हल्ल्याचे समर्थन केले, ज्यामुळे त्यांना बर्मा मंडाले तुरुंगात पाठवण्यात आले.१ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल आदरांजली वाहताना महात्मा गांधींनी त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हटले, जवाहरलाल नेहरूंनी त्यांना भारतीय क्रांतीचे जनक म्हटले. - साभार - इंटरनेट

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### तुळशीचे पाणी पिण्याचे अमृतासमान फायदे

प्राचीन काळापासून एक पवित्र वनस्पती म्हणून दारी राहणाऱ्या तुळशीला विशेष मान आहे. तुळशीचे औषधी गुणधर्मसुद्धा अनेक आहेत. अगदी रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापासून ते श्वसनाच्या समस्या सोडवण्यापर्यंत अनेक प्रश्नावर तुळशीचे सेवन हे रामबाण उपाय ठरते.



तुळशीला डप्टोजेन मानले जाते, याचा अर्थ तुळस शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करते. तुळशीमध्ये इम्युनोमोडचुलेटरी गुणधर्मदेखील असतात, याचा अर्थ ते शरीराची रोगप्रतिकारक प्रतिक्रिया वाढवू शकते. हे गुणधर्म संक्रमण आणि आजारांपासून लढण्यास मदत करू शकतात.

**तणावावर नियंत्रण**

तुळशीचे पाणी शरीराला शांत करू शकते, अंतर्गत हालचालींची लय संतुलित राहते. त्यामुळे ज्यांची जीवनशैली फार तणावग्रस्त आहे त्यांनी दिवसातून एकदा हे तुळशीचे पाणी प्यायल्यास फायदा होऊ शकतो.

**पचनाला मदत**

तुळशीमध्ये कार्मिनेटिव गुणधर्म असतात जे गॅस आणि सूज कमी करण्यास मदत करू शकतात. काही अभ्यासांमध्ये असेही सुचवले आहे. यामुळे आतड्याचे कार्य सुधारू शकते, पचनास मदत होते.

**श्वसनासाठी मदत**

वर्षानुवर्षे तुळशीच्या पानांचा वापर खोकला, सर्दी आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या दूर करण्यासाठी केला जात आहे. तुळशीमध्ये कफनाशक गुणधर्म असतात, कफ बाहेर टाकण्यास आणि रक्त साचून गुठळ्या होण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत करतात. तुळशीचे दाहकविरोधी गुणधर्म घसा खवखवणे किंवा जळजळणाऱ्या श्वसननलिकेस शांत करू शकतात.

**अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस**

तुळशीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्ससारखे विविध अँटिऑक्सिडंट्स असतात. हे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढण्यास मदत करतात. तुळशीच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक अँटिऑक्सिडंट्सचा पुरवठा वाढू शकतो ज्यामुळे अनेक आजरांपासून संरक्षण मिळू शकते. याविषयी अजून सविस्तर संशोधन होण्याची गरज आहे.

# रायगड जिल्ह्यात आरोग्य आणि रक्तदान शिबिर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधत उपक्रम

### खोपोली भाजप आयोजित रक्तदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधत संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षातर्फे सेवाभाव दिवस साजरा करण्यात येत आहे या पार्श्वभूमीवर खोपोली भाजप मंडळातर्फे महाराजा मंगल कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे उद्घाटन तरुण उद्योजक विक्रम शेठ साबळे यांनी स्वतः रक्तदान करून उद्घाटन केले

यावेळी जिल्हा महिला अध्यक्ष अश्विनीताई पाटील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे खोपोली मंडळ अध्यक्ष राहुल जाधव खोपोली महिला अध्यक्ष अश्विनी अत्रे माजी नगरसेवक इंदरमल खंडेलवाल अविनाश तावडे सूर्यकांत देशमुख, हेमंत नांदे, रसिका शेटे, स्नेहल सावंत, अपर्णा मोरे, अनिता शहा, विकास खुरपडे, संजय म्हात्रे, अपर्णा साठे, सुमती महर्षी, विभा पाठक, गीता मोहिते यासह अनेक कार्यकर्ते या शिबिराला उपस्थित होते. शिबिरात तरुणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.



### पेणमध्ये युवा मोर्चातर्फे रक्तदान शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

भाजप पेण तालुका युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पेण भाजप कार्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, युवा नेते ललित पाटील, पेण पश्चिम मंडळ अध्यक्ष विजय पाटील, मा.जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, मा.जि.प. सदस्य डी.बी. पाटील, मा. सरपंच विवेक पाटील, मा. सरपंच अमित पाटील, मा. सभापती सुरेश पाटील, मा. सभापती प्रफुल्ल म्हात्रे, वाशी सरपंच संदेश ठाकूरमी परशुराम पाटील, आदीसंह पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावली.




यावेळी भाजपजिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील आज स्वप्नील म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली स्तुत्य उपक्रम राबिवण्यात आला असून तालुक्यातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी या शिबिराला प्रतिसाद दिला आहे असे उपक्रम या पुढेही होवोत अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या. या वेळी जिल्हा रक्त पेढी अलिबाग यांच्या माध्यमातून रक्त संकलनाचे काम करण्यात आले. यावेळी बाजार समिती कर्मचारी नरेश पाटील यांनी ३७ व्यांदा तर पत्रकार संतोष पाटील यांनी ४८ व्यांदा रक्तदान केले.

## रोह्यात मोफत आरोग्य शिबिरात २०० नागरिकांचा सहभाग

**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाने संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला असून, त्याचाच एक भाग म्हणून मंगळवार (दि. २२) रोहा शासकीय विश्रामगृहात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात २०० हून अधिक नागरिकांनी वैद्यकीय सेवा व सल्ल्याचा लाभ घेतला.



हा उपक्रम भाजप रोहा तालुका व मुख्यमंत्री सहायता वैद्यकीय मदत कक्ष रायगड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. विविध वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपस्थितीत आरोग्य तपासणी, औषधोपचार व सल्ला मोफत उपलब्ध करून देण्यात आला. या शिबिराला भेट देण्यासाठी भाजप नेते व माजी आमदार पंडित पाटील, उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा चित्राताई पाटील, महिला उपाध्यक्ष श्रेया कुंठे, उपाध्यक्ष सवाई पाटील होते. रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली व युवा मोर्चाचे सरचिटणीस रोशन चाफेकर यांच्या सहकार्याने उपक्रम यशस्वी करण्यात आला त्यावेळी जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग ,तालुका सरचिटणीस कृष्णा धामणे , निलेश धुमाल ,शैलेश रावकर, रविंद्र तारु ,युवा मोर्चाचे चिटणीस नरेश कोकरे, सनील इंगावले सोशल मीडिया रायगड जिल्हा संयोजक , वैभव कुलकर्णी , रिया कसार , सागर जोगडे , विकास बामणे, सौरभ जोगडे, संकेत मोरे ,ऋषिकेश माने , परेश चितळकर, राजेशमोरे , सचिन मोरे, दरनेश दारला, प्रखर त्रिपाठी, राकेश चाफेकर ,सुमित रिसबुड , निलेश जंगम ,दिपक मोरे, संदेश बैकर , मृणाल पेंडसे ,स्मृती जोशी ,रसिका जाधव, तन्वी गुरव व कार्यकर्ते उपस्थित होते .


### सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल तालुका यांचे समोर

**सहाय्यक निबंधक पनवेल, ता. पनवेल/कलम १०१/ सुनावणी नोटीस /२०२५**

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय, पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि.रायगड ४१०२०६**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल ता. पनवेल जि. रायगड या संस्थेने खालील प्रतिवादी विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये थक्कबाकी वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज या कार्यालयाकडे दाखल केले असून त्यासंबंधी वेळोवेळी सुनावणी घेण्यात आली. तथापी खालील नमूद प्रतिवादी यांना वादीने उपलब्ध करून दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने नोटीस देऊन देखील नोटीस बजावणी झालेली नाही. त्यामुळे खालील नमुद प्रतिवादी यांना या जाहीर नोटीशीद्वारे त्यांचे म्हणणे मांडणेसाठी एक संधी देण्यात येत असून कळविण्यात येते की, सदर प्रकरणी अंतिम सुनावणी सोमवार दि. ०४/०८/२०२५ रोजी सकाळी ठिक ११. ३० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल, पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि. रायगड या कार्यालयात आयोजित केलेली आहे. सदर दिवशी आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वतः किंवा आपल्या वैध प्रतिनिधींमार्फत हजर रहावे या कामी आपण गैरहजर राहिल्यास आपणास या बाबत काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहित धरून आपल्या अनुपस्थीत वादी संस्थेने दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

| दावा क्रमांक | प्रतिवादी नाव व पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|
| २७३/२०२५ | १) श्री. निलेश सुरेश घोणकर रा. फ्लॅट नं. ६०४/७०४, राधा हरि निवास, टिळक रोड, कमळ महिला पतपेढीच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६<br>२) श्री. परेश सुरेश चोणकर रा. फ्लॅट नं. ६०४/७०४, राधा हरि निवास, टिळक रोड, कमळ महिला पतपेढीच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड, ४१० २०६<br>३) श्री. किरण वासूदेव जेठनानी रा. राधा हरि निवास, फ्लॅट नं. जे-१०२, पहिला मजला, टिळक रोड, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ | २०,१४,४६९/- |
| २७५/२०२५ | १) श्री. प्रतिक वसंत वाजेकर रा. घर क. ३८ अे-१, मिरची गल्ली, कुंभार वाडा, संत गोरा कुंभार मंदिराजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६<br>२) श्री. संदिप मधुकर पाटील रा. रूम नं. ११४५ अे, मिरची गल्ली, वैश्य समाज हॉल जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१० २०६ | ५०,२६७/- |
| २७४/२०२५ | १) श्री. बाळु बन्सी केदार रा. सुयश को.ऑप.हौ. सोसायटी, फ्लॅट नं. ०४, बी/६, सेक्टर-७, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड, ४१० २०६<br>२) श्री. नाथा बाळाराम घरत रा. कोन, घरत आळी, मेडिकल जवळ, पो. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६<br>३) श्री. धीरज साहेबराव तांदळे रा. कोन, म्हात्रे आळी, ओल्ड मुंबई पुणे हायवे, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४५०२०६ | २,३०,४९८/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्यानिशी दिली असे.
स्थळ- पनवेल
दिनांक २१/०७/२०२५

शिक्का

**सही/-**
**(भासी काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड**

**जा.क्र. १९९६/२०२५**


## कर्जत शहरात रक्तदान शिबिर उत्साहात



**नेरळ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस भाजपच्यावतीने सामाजिक कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात पार पडला आहे.यासाठी रक्तदान शिबिराच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सकाळ पासून रक्तदात्यांनी आपली हजेरी लावून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.यावेळी रक्तदात्यांचे आभार म्हणून त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.या शिबिराच्या ठिकाणी भाजप पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कर्जत तालुक्यातील भाजप नेरळ शहर मंडल अध्यक्ष नरेश उर्फ पपू मसने यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस सामाजिक कार्याने साजरा केला आहे.राज्यात रुग्णाला कमी पडत असणारा रक्ताचा पुरवठा लक्षात घेता आज रक्तदान शिबिराचे आयोजन नेरळ शहरात केले होते.

यावेळी मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी हजेरी लावून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.यावेळी भाजप नेरळ मंडळ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याशिवाय कर्जत तालुक्यातील कर्जत शहर मंडल अध्यक्ष राजेश लाड यांनी कर्जत शहर तर कशेळे ग्रामीणचे दिनेश रसाळ यांनी कशेळे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

## दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी युवानेते निलेश थोरे

**माणगाव : प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख नेतृत्वाच्या आदेशाने निलेश कुंडलिक थोरे यांची भारतीय जनता पार्टीच्या दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे. थोरे यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी दिले आहे. निलेश थोरे यांच्या फेर नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



**अलिबाग : नालंदा ऑर्गनायझेशन पुणे यांच्यावतीने संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या सर्वेक्षण (२०१७-२०२२) अतर्गत महाराष्ट्रातील एकूण ४० ग्रामपंचायती पुरस्कारास निवडल्या गेल्या. त्यामध्ये पेण तालुक्यातील एकमेव कोप्रोली ग्रामपंचायतीची निवड झाली असून,सरपंच विकास पा.पाटील यांस ग्रामसमृद्धी आदर्श सरपंच पुरस्कार २०२५ या पुरस्काराने गौरवण्यात आले.**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर सूचना देण्यात येते की, श्री. शांताराम मारुती दाभणे व श्री. शरद रामचंद्र दाभणे यांच्या मालकीचे प्रत्यक्ष ताबेकब्जातील मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद शेतजमिन मिळकतीमधील श्री. शांताराम मारुती दाभणे यांच्याकडून २९ गुंठे व श्री. शरद रामचंद्र दाभणे यांच्याकडून ६१.३ गुंठे क्षेत्र शेतजमिन आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेणार आहेत.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड**

| गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४ | १ | १-४६-५०<br>पो.ख. ०-०७-००<br>एकूण क्षेत्रफळ १-५४-६०<br>पैकी श्री. शांताराम मारुती दाभणे यांची २९ गुंठे व श्री. शरद रामचंद्र दाभणे यांची ६१.३ गुंठे | १४.८७ |

तरी सदरहू मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्ट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपाआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखीपुराव्यासहीत आपल्या हरकती नोंदवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व लोकांस कळावे.

**दिनांक २२/०७/२०२५**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**आनंद वाय. धोंगडे**
**अॅडव्होकेट**
**१०३, ए विंग, निल रिद्धी एमरलॅण्ड, प्लॉट नं. ५२७, तहसील ऑफिस जवळ, पनवेल**
**मोबाईल नं. ७५०६४९८५०३**



### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | 1) M/s. Thakur Infraprojects Pvt, Ltd. 1st floor, Om sadnika Bldg, Plot No-265/1, Panvel-Uran road, Panvel<br>व<br>2) Executive Engineer., Maharastra State Infrastructre Development Corporation Limited, Office- B/13, 13th Floor, Bakhtawar Building, Nariman Point, Mumbai | ०२ विलायती चिंच झाडे तोडणे व ७० पिंपळ, २३ सुबाभूळ, ०४ सप्तपर्णी, ७४ बदाम, १५ रेन ट्री, ०८ वड, १२७ उंबर, २९ गुलमोहर, ३९ सोनमोहर, ५६ विलायती चिंच, १४ जांभूळ, ४० नारळ, १८ अशोका, ०३ करंज, ०३ बाभूळ, २२ आंबा, ०१ बोर, १० निलगिरी, ०७ शेवगा, १२ चेरी, ०२ एडन, ०३ अर्जुन, ०१ आसन, ०१ बकूळ, ०६ बेल, ०३ भेंडी, ०२ चाफा, ०१ धामन, ०१ सोनेरी, १४ कदंब, ०१ खैर, ०१ मोह, ०३ निंब, ०१ फणस, ०२ रामफळ, ०७ रॉयल पाम, ०२ सिताफळ, १८ जंगली, १५ बॉटल पाम, ११ जंगली उंबर, १२ कांचन, ०५ पेरू व ०३ पाईन ट्री अशी एकूण ६९० झाडे पुनर्रोपण करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली जंक्शन येथे उड्डाण पूलांचे व रस्त्यांचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. त्याचा तपशिल खालीप्रमाणे:<br>१. स्टीलयार्ड रोड पुणे ते पनवेल जे.एन.पी.टी.कडे जाणारा रस्ता येथे ०१ झाड तोडणे व १८९ झाडे पुनर्रोपण करणे.<br>२. मॅक्डोनल्ड रोड ते कळंबोली सर्कल येथील वाहतूक पोलिस चौकी येथे ०१ झाड तोडणे व २०० झाडे पुनर्रोपण करणे.<br>३. शिळफाटा रोड ते स्टीलयार्ड रोड येथे २७ झाडे पुनर्रोपण करणे.<br>४. जे.एन.पी.टी रोड ते एम.जी.एम. रोड येथे २७४ झाडे पुनर्रोपण करणे |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/ पुनर्रोपण परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३४५/३५५/२०२५**
**दिनांक :- २२/०७/२०२५**

**सही /-**
**उपायुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**

भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या महायुती सरकार २.० चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आज वाढदिवस आहे. या निमित्ताने परिश्रम परिवारातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. काहीजण त्यांना 'राजकारणाचे चाणक्य' म्हणतात, तर काहीजण 'देवा भाऊ'. परंतु अनेकदा हरलेली लढाई जिंकणारे देवेंद्र यांनी हे सिद्ध केले आहे की, ते खऱ्या अर्थाने एक दूरदर्शी आणि सक्षम युवा नेता आहेत.

# मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस शपथ घेतो की...



### राजकारणाचा वारसा :

22 जुलै 1970 रोजी नागपूरच्या एका ब्राह्मण कुटुंबात जन्मलेले फडणवीस यांना राजकारणाचा वारसा लाभला आहे. त्यांचे वडील गंगाधरराव फडणवीस हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनसंघाचे सक्रिय सदस्य होते. ते राज्य विधानपरिषदेचे सदस्य देखील होते. वडिलांकडून राजकारणाचा वारसा लाभूनही, देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांनी प्रारंभिक शिक्षण नागपूरमध्ये पूर्ण केले. 1992 मध्ये नागपूर विद्यापीठातून एलएलबीची पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले आणि डीएसई बर्लिन येथून प्रोजेक्ट मॅनेजमेंटच्या 'मेथड अँड टेक्निक्स' या विषयात डिप्लोमा मिळवला.

### राजकीय प्रवास :

'देवा भाऊ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या फडणवीस यांनी आपला राजकीय प्रवास अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून सुरु केला. 1992 मध्ये प्रथमच नागपूर महापालिकेचे नगरसेवक म्हणून निवडून आले. 1997 ते 2001 या कालावधीत नागपूरचे महापौर म्हणून कार्यरत होते. 1999 मध्ये प्रथमच आमदार म्हणून निवडून आले. त्यांनी भाजपच्या प्रदेशाध्यक्ष पदाचीही जबाबदारी पार पाडली. 2013 मध्ये राज्यातील भाजपमध्ये नितीन गडकरी, गोपीनाथ मुंडे, एकनाथ खडसे यांसारख्या दिग्गज नेत्यांचे वर्चस्व होते. मात्र, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने फडणवीस यांच्यावर विश्वास दाखवत राज्याच्या नेतृत्वाची सूत्रे त्यांच्याकडे सोपवली. 2014 मध्ये ते प्रथमच मुख्यमंत्री बनले. ते महाराष्ट्राचे 18वे मुख्यमंत्री आणि भाजपचे पहिले मुख्यमंत्री ठरले. केवळ 44 व्या वर्षी ते राज्याचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वांत लहान मुख्यमंत्री झाले.

### राज्यसभा निवडणुकीत चमत्कार :

देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कौशल्यामुळे राज्यसभा निवडणुकीत भाजप महाराष्ट्रातून आपली तिन्ही जागा वाचवण्यात यशस्वी ठरली. 10 जून 2022 रोजी महाराष्ट्रात राज्यसभेच्या 6 जागांसाठी निवडणूक पार पडली. त्या वेळी सत्तेवर असलेल्या महाविकास आघाडीकडून (मविआ) प्रफुल्ल पटेल (रा.काँ.), इमरान प्रतापगढ़ी (काँग्रेस) आणि शिवसेनेकडून संजय राऊत व संजय पवार हे उमेदवार रिंगणात होते. तर भाजपकडून पियूष गोयल, अनिल बोंडे आणि तिसऱ्या उमेदवार म्हणून धनंजय महाडिक यांना उमेदवारी देण्यात आली होती. जेव्हा निवडणूक निकाल जाहीर झाले, तेव्हा पुरेसे संख्याबळ नसतानाही भाजपचे तिन्ही उमेदवार विजयी झाले. तर शिवसेनेचे दुसरे उमेदवार (संजय पवार) पराभूत झाले. महाविकास आघाडीला केवळ 162 आमदारांचेच समर्थन मिळाले. त्याउलट, भाजपला आश्चर्यकारकपणे 123 आमदारांचे समर्थन मिळाले, जे मविआच्या अंदाजापेक्षा 10 अधिक होते.

### विधान परिषद निवडणुकीत दिला धक्का :

20 जून 2022 रोजी विधान परिषदेच्या 10 जागांसाठी निवडणूक झाली. भाजपने पाच उमेदवार उभे केले, तर शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस यांनी प्रत्येकी दोन उमेदवार रिंगणात उतरवले. संख्याबळानुसार भाजपचे 4 आणि महाविकास आघाडीचे 6 उमेदवार निवडून येतील असा अंदाज होता. मात्र फडणवीस यांनी पाचवा उमेदवार रिंगणात उतरवून मोठा राजकीय डाव खेळला. निकालात भाजपचे पाचही उमेदवार विजयी ठरले. काँग्रेसचा एक उमेदवार पराभूत झाला. यामुळे महाविकास आघाडीत भूकंप झाला. त्यानंतर शिवसेना दोन गटांत विभागली. उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या गटाचे नेतृत्व करत भाजपसोबत युती केली. आणि मुख्यमंत्री झाले.

### "समुद्र आहे, परत येईल" आणि ते आलेच!

2024 लोकसभा निवडणुकीत महायुतीचे प्रदर्शन अपेक्षेप्रमाणे झाले नाही. मात्र त्यानंतर अवघ्या चार महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने 288 पैकी 234 जागांवर विजय मिळवला. भाजपला विक्रमी 132 जागा मिळाल्या. शिंदे गटाच्या शिवसेनेला 55 तर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला 41 जागा मिळाल्या. 5 डिसेंबर 2024 रोजी देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी त्यांची 2019 मधील विधानसभेतली ओळ पुन्हा आठवली – "माझं पाणी ओसरल्यावर माझ्या किनाऱ्यावर घरं बांधू नका... मी समुद्र आहे, परत येईन!" – आणि ते खरोखरच परतले, आणि 'सागर'वरुन थेट 'वर्षा'वर पोहोचले.

### जन सुरक्षा अधिनियम

शहरी नक्षलवादाला लगाम घालण्यासाठी राज्य सरकारने जन सुरक्षा अधिनियम सादर केला आहे. मात्र या अधिनियमाविषयी चुकीची माहिती पसरवली जात आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, हा अधिनियम व्यक्तीस्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी आहे. या अधिनियमानुसार कोणत्याही व्यक्तीला थेट अटक करता येणार नाही. कोणत्याही कारवाईसाठी ठोस, न्यायालयात ग्राह्य धरण्यायोग्य पुरावे आवश्यक आहेत. जर एखाद्या संघटनेवर बंदी आणायची असेल, तर ती न्यायालयीन देखरेखीखालीच करण्यात येते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवलेल्या भारतीय संविधानाचे आणि लोकशाही मूल्यांचे पालन करण्यावर अधिनियम भर देतो.

### वाहतूक व्यवस्थेतील सुधारणांचे प्रयत्न

■ मुंबईतील उपनगरीय लोकल ट्रेन्स या शहराची 'लाईफलाईन' मानल्या जातात. मात्र वाढती लोकसंख्या आणि प्रवाशांची गर्दीमुळे ही लाईफलाईन आता 'डेथलाईन' होत चालली आहे. त्यामुळे सर्व लोकल ट्रेन्स बंद दरवाज्यांसह वातानुकूलित करण्याचा विचारही सरकार करत आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वे मंत्र्यांकडे विशेष विनंती करण्यात आली असून, यावर सकारात्मक निर्णय झाला आहे.

### गुन्हेगारीवर कठोर नियंत्रण

■ मुख्यमंत्री फडणवीस राज्यात कायदा आणि सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी विधानसभेत बोलताना त्यांनी सांगितले की महाराष्ट्र 'सुरक्षेपासून विकासाकडे' वाटचाल करत आहे. विशेषतः सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार गंभीर आहे. यामुळे सायबर गुन्हे व आर्थिक फसवणूक यांची शोधदर लक्षणीयरीत्या वाढली आहे.

■ फडणवीस यांनी विधानसभेत एमव्हीएस नियम 292 अंतर्गत झालेल्या चर्चेच्या उत्तरात सांगितले की, 2023च्या तुलनेत 2024-25 मध्ये राज्यात 11,659 गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे. सायबर गुन्ह्यांची शोधदर 16 टक्क्यांवरुन 19 टक्के झाली आहे, तर आर्थिक फसवणुकीतून वसुली दर 20.75 टक्क्यांवरून 61 टक्क्यांवर पोहोचला आहे. 'गोल्डन अवर'मध्ये माहिती मिळाल्यास 90 टक्के प्रकरणांत धनवाचवता येते.

■ सायबर सुरक्षेसाठी एक 'सायबर कॉर्पोरेशन' स्थापन करण्यात आले आहे आणि जिल्हास्तरावर 50 सायबर प्रयोगशाळा सुरु करण्यात आल्या आहेत. तसेच, सायबर तक्रारींसाठी 1945 व 1930 हे विशेष हेल्पलाइन क्रमांक सुरु करण्यात आले आहेत. महिलांवरील अत्याचारातील 91 टक्के प्रकरणांचा छडा लागलेला आहे, बलात्काराच्या प्रकरणांत 98 टक्के आरोपींची ओळख पटलेली आहे, आणि 60 दिवसांत निकाल लागणाऱ्या प्रकरणांचा दर 97.3 टक्क्यांवर पोहोचला आहे. तसेच अमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई निर्देश त्यांनी काढले आहे.

### शेतकऱ्यांसाठी 'हरित वीज क्रांती'

■ महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे जे शेतकऱ्यांना 'हरित वीज' उपलब्ध करून देणार आहे. या निर्णयामुळे राज्याला वीज खरेदीत सुमारे ₹10,000 कोटींची बचत होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की राज्याच्या शाश्वत विकासासाठी एक 'ब्लूप्रिंट' तयार करण्यात आला असून, सध्या राज्यातील 50 टक्के वीज ही हरित स्रोतांतून निर्मित होत आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांत वीजदर कमी होतील.

■ पंतप्रधान कुसुम योजनेअंतर्गत राज्यात 60 टक्के कृषी पंप बसविण्यात आले आहेत. अवघ्या तीन महिन्यांत 3 लाख 86 हजार कृषी पंप बसवले गेले आहेत, त्यामुळे 23 लाख एकर जमीन सिंचनाखाली आली आहे. पंतप्रधान सौर घर मोफत वीज योजनेअंतर्गत घरांच्या छतांवर सोलर रूफ टॉप प्रणाली बसवली जात आहे. योजनेमुळे 30 लाख कुटुंबांना फायदा होईल आणि त्यांना वीज बिल देण्याची आवश्यकता भासणार नाही.

### विकासाला सर्वोच्च प्राधान्य

मुख्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या विकासावर आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केले आहे. 2027 पर्यंत महाराष्ट्राला 1 ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट त्यांनी निश्चित केले आहे. यामार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारताला 5 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी फडणवीस आपला सक्रिय वाटा उचलत आहेत. या उद्दिष्टासाठी ते राज्यात प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीला (एफडीआय) प्रोत्साहन देत आहेत. त्यांच्या प्रोत्साहनात्मक धोरणांमुळे महाराष्ट्र एफडीआयच्या बाबतीत देशात पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. . लोकांच्या सुरक्षिततेसाठी 13,560 पोलिस पदांची भरती करण्यात येणार आहे. मागील तीन वर्षांत 38,802 पोलीस पदांची भरती करण्यात आलेली आहे, यामुळे हजारो युवकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. 'शालार्थ आयडी' प्रकरणातील गैरव्यवहार गांभीर्याने घेतले गेले असून (SIT) नेमण्यात आले आहे.


# मुंबई मेट्रो : मुंबईची बदलणारी नवी ओळख

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा प्रभाव

मुंबई ही पूर्वी केवळ लोकल ट्रेन व बेस्ट बस सेवांवर अवलंबून असलेली महानगरी आज एक आधुनिक, स्मार्ट आणि परस्परसंलग्न शहर म्हणून झपाट्याने उभी राहत आहे. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे - मुंबई मेट्रो नेटवर्क. मुंबई आणि उपनगरांना जोडणारे सर्वात वेगवान, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक साधन बनलेली मेट्रो ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा आणि दृढ इच्छाशक्तीचा परिणाम आहे.

### उपनगरांपासून मुंबईच्या केंद्रापर्यंत थेट जोडणी

मुंबई मेट्रो नेटवर्क केवळ मुंबईपुरते मर्यादित न राहता, मीरा-भाईंदर, ठाणे, कासारवडवली, कल्याण व अंबरनाथपर्यंत विस्तारित होत आहे. यामुळे उपनगरांमधून शहराच्या केंद्रभागात पोहोचण्यास लागणारा वेळ कमी होईल आणि वाहतूक कोंडीवरही मोठा परिणाम होईल. ईस्ट-वेस्ट कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने मेट्रो एक क्रांतिकारी पाऊल ठरत आहे.



### सद्यस्थितीत कार्यरत मेट्रो मार्ग - मुंबईची नवी वाहतूकधारा

■ मेट्रो लाइन 1 (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर, 11.4 किमी)

पूर्व-पश्चिम जोडणीमुळे 70 मिनिटांचा प्रवास फक्त 21 मिनिटांत होतो. दररोज लाखो प्रवासी वापरतात.

■ मेट्रो लाइन 2A (दहिसर ते डीएन नगर, 18.6 किमी)

17 स्थानकांसह ही लाईन पश्चिम उपनगरांत जोडणी देते. लाईन 1, 7 सोबत जोडलेली आहे.

■ मेट्रो लाइन 3 (आरे-वरळी-सीप्झ, 22.4 किमी)

मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो. दादर, धारावी, सिद्धिविनायकसारख्या ठिकाणी थांबे. वेळ व ऊर्जा वाचते.

■ मेट्रो लाइन 7 (अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व), 16.5 किमी)

13 स्थानकांसह ही लाईन पश्चिम द्रुतगती महामार्गासोबत चालते. ट्राफिकपासून मुक्तता आणि नोकरी करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा.

### वर्षभरात सुरु होणारे मेट्रो मार्ग

■ मेट्रो 2बी : मंडाले ते डायमंड गार्डन (5.6 किमी)

■ पूर्व मुंबईसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. हा मार्ग 2ए, 1 व मोनोरेलशी जोडला जाणार असून पूर्व उपनगरातील प्रवास अधिक सोयीचा होईल.

■ मेट्रो 9 व 7ए : काशीगाव ते दहिसर (पूर्व) व दहिसर ते अंधेरी विमानतळ टी 2

■ या दोन्ही मार्गांचे तांत्रिक कार्य सुरु आहे. हे मार्ग मीरा-भाईंदर, दहिसर, अंधेरी व आंतरराष्ट्रीय विमानतळाशी थेट जोडले जातील. 2026 च्या अखेरीस हे मार्ग पूर्णतः कार्यरत होण्याची शक्यता आहे.

■ मेट्रो 4 व 4ए : वडाळा ते कासारवडवली, पुढे गायमुखपर्यंत

■ ठाण्यासाठी हे मार्ग अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे मार्ग ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, मध्य रेल्वे, मोनोरेल व इतर मेट्रो मार्गांशी संलग्न राहतील, ज्यामुळे दररोज लाखो प्रवाशांना फायदा होणार आहे.

### 2014 पूर्वी आणि त्यानंतरचा बदल

2014 पूर्वी मुंबईमध्ये केवळ एकच मेट्रो मार्ग (लाइन-1 : वर्सोवा- अंधेरी- घाटकोपर) कार्यान्वित होता, ज्याची लांबी केवळ 11 किमी होती. यानंतर मेट्रोचा विस्तार अत्यंत संथ गतीने होत होता. मात्र 2014 मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे नेतृत्व स्वीकारल्यावर मुंबई मेट्रोच्या विकासाला खरी गती मिळाली. त्यांनी केवळ योजना आखल्या नाहीत, तर जमीन संपादन, निधी संकलन, निविदा प्रक्रिया व बांधकाम यामध्ये पारदर्शकता व वेग आणून प्रकल्प राबवण्यास सुरुवात केली.

आज मुंबई महानगर प्रदेशात (MMR) 337.1 किमी लांबीचे 12 मेट्रो कॉरिडॉर प्रस्तावित आहेत, यापैकी 67.16 किमी लांबीच्या चार मेट्रो मार्गांचे कार्यान्वयन पूर्ण झाले असून 165.7 किमी लांबीचे आठ मार्ग विविध बांधकाम टप्प्यांवर आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्पष्ट उद्दिष्ट आहे की, डिसेंबर 2025 पर्यंत मुंबईत 100 किमी मेट्रो नेटवर्क पूर्णपणे कार्यरत व्हावे.

### देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रोच्या प्रत्येक प्रकल्पाकडे 'मिशन मोड'च्या दृष्टीने लक्ष दिले असून प्रकल्पाच्या तातडीने व प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्य केले आहे. निधी उपलब्ध करणे, तांत्रिक मंजुरी मिळवणे, केंद्र सरकारसोबत समन्वय व जनतेसोबत संवाद या सर्व स्तरांवर त्यांनी प्रभावी नेतृत्व दिले आहे. मुंबई मेट्रोसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास यशस्वीरीत्या पुढे नेणे हे त्यांच्या प्रशासकीय कुशलतेचे व दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे.

RCI

# परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र क्रमांक १ वर

2025 मध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, चालू आर्थिक वर्षात थेट परदेशी गुंतवणूक (एफ.डी.आय.) मागील वर्षाच्या तुलनेत 14 टक्क्यांनी वाढून 2 अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. एक वर्ष आधीच्या आर्थिक वर्षात ही गुंतवणूक 2023-24 अब्ज डॉलर्स इतकी होती.

महाराष्ट्रात एकूण थेट परदेशी गुंतवणुकीपैकी 39 टक्के गुंतवणूक प्राप्त झाल्याने राज्याने चालू आर्थिक वर्षात सर्वाधिक थेट परदेशी गुंतवणूक (एफ.डी.आय) आकर्षित केली आहे. महाराष्ट्राच्या खालोखाल कर्नाटकला 13 टक्के आणि दिल्लीला 12 टक्के थेट परदेशी गुंतवणूक प्राप्त झाली. ज्या देशांमधून भारतात थेट परदेशी गुंतवणूक झाली त्यात सिंगापूरचा वाटा 30 टक्के असून, मॉरिशसचा वाटा 17 टक्के आहे. त्यानंतर अमेरिका 11 टक्के वाट्याने तिसऱ्या क्रमांकावर आहे.

### ७४८.७८ अब्ज डॉलर्सची एफ.डी.आय

मागील 11 वर्षांमध्ये, म्हणजेच आर्थिक वर्ष 2014 ते 2025 दरम्यान, भारतात थेट परदेशी गुंतवणुकीच्या स्वरूपात एकूण 748.78 अब्ज डॉलर्स प्राप्त झाले आहेत. हे मागील 11 वर्षांच्या तुलनेत सुमारे 143 टक्क्यांची वाढ दर्शवते. चालू आर्थिक वर्षात एकूण 12 कोटी डॉलर्स थेट परदेशी गुंतवणूक भारतात आली.

या संदर्भात माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आर्थिक वर्ष 2024-25 च्या शेवटच्या तिमाहीतील (जानेवारी ते मार्च 2025) आकडेवारी जाहीर झाली असून, या वर्षात महाराष्ट्राने एकूण 1,64,875 कोटी रुपये परदेशी गुंतवणूक आकर्षित केली आहे. ही गुंतवणूक देशातील एकूण गुंतवणुकीच्या 40 टक्के आहे. यावर्षी भारतात एकूण 4,21,929 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

महाराष्ट्राला मागील वर्षाच्या तुलनेत 32 टक्के अधिक गुंतवणूक मिळाली आहे या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतच राज्यात 25,441 कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक आली आहे. हे वर्ष महाराष्ट्रासाठी गेल्या 10 वर्षांतील सर्वाधिक गुंतवणूक प्राप्त होणारे वर्ष ठरले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, हा विक्रम राज्याने आर्थिक वर्षाच्या पहिल्या 9 महिन्यांतच पूर्ण केला असून, यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

**महाराष्ट्रातील थेट परदेशी गुंतवणुकीचा वार्षिक आलेख (₹ कोटींमध्ये)**

| वर्ष | गुंतवणूक |
|---|---|
| २०१५-१६ | ६१,४८२ |
| २०१६-१७ | १३१९८० |
| २०१७-१८ | ८६२४४ |
| २०१८-१९ | ५७१३९ |
| २०१९ (एप्रिल- ऑक्टोबर) | २५,३१६ |
| २०२०-२१ | ११९७३४ |
| २०२१-२२ | ११४९६४ |
| २०२२-२३ | ११८४२२ |
| २०२३-२४ | १२५१०१ |
| २०२४-२५ | १६४८७५ |

# २०४७ पर्यंत एमएमआर क्षेत्राचे अर्थव्यवस्थेत १.५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सइतके योगदान

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने मुंबई महानगर क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी बहुआयामी रोडमॅप तयार केला आहे. मुंबई महानगर क्षेत्राला एक जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र व विकासाचे केंद्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न सुरु आहे. याअंतर्गत मुंबईत आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमान सात व्यावसायिक केंद्रे उभारण्यात येणार असून, त्याद्वारे शहराची अर्थव्यवस्था सध्याच्या स्थितीतून 1.5 ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**व्यावसायिक केंद्रांची निर्मिती**

वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी), कुर्ला-वरळी क्षेत्र, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर आणि विरार-बोईसर या भागांत आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यावसायिक केंद्रे स्थापन केली जाणार आहेत. वाढवण बंदर प्रकल्पात राज्य सरकारचा 26 टक्के वाटा आहे. हे बंदर 76,220 कोटी रुपयांच्या खर्चाने उभारले जात असून, हे जेएनपीटीपेक्षा तीनपट मोठे असेल. या प्रकल्पामुळे वाढवण बंदर जगातील अव्वल दहा बंदरांमध्ये गणले जाईल.

**जलवाहतुकीला चालना**

राज्य सरकार गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा आणि एलिफंटा दरम्यान सुरक्षित जलवाहतूक सेवा सुलभ करण्यासाठी आधुनिक व सुसज्ज बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याच्या धोरणावर काम करत आहे. याशिवाय नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जलवाहतुकीद्वारे जोडण्याची योजना आखण्यात आली आहे.

**देशाच्या अर्थव्यवस्थेतील योगदान**

मुंबई हे शहर भारताच्या एकूण राष्ट्रीय सकल गृह उत्पन्नाच्या 6.16 टक्के उत्पत्ती करते. मुंबईचे प्रतिव्यक्ती जीडीपी सुमारे 23,000 अमेरिकन डॉलर्स आहे. मुंबईची एकूण संपत्ती सुमारे 1 ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स आहे, ज्यामध्ये 46,000 कोट्याधीश आणि 92 अब्जाधीश समाविष्ट आहेत. मुंबई भारतीय औद्योगिक रोजगाराच्या 10%, भारतातील उत्पन्नकर संकलनाच्या 30%, मनोरंजन कराच्या 45%, सीमा शुल्क संकलनाच्या 60%, केंद्रीय उत्पादन शुल्क संकलनाच्या 20%, परकीय व्यापाराच्या 40%, भारतीय शेअर बाजाराच्या मालमत्तेच्या 100% आणि कॉर्पोरेट करांच्या स्वरूपात 1,60,000 कोटी रुपयांचे योगदान देते.

**नवीन विमानतळामुळे विकासाला पंख**

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडणारी मेट्रो सेवा लवकरच सुरु होणार आहे. उलवे येथे नव्याने विकसित होणारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुमारे 1160 हेक्टर क्षेत्रात पसरले असून, या विमानतळाची वार्षिक प्रवासी क्षमता 90 कोटी आणि मालवाहतूक क्षमता 2.6 कोटी टन इतकी असेल.

**नवी मुंबईत एज्यु-सिटीचा प्रस्ताव**

अटल सेतूच्या माध्यमातून तिसऱ्या मुंबईचा विकास होत आहे. याच पार्श्वभूमीवर नवी मुंबईत एका 'एज्यु-सिटी'ची उभारणी प्रस्तावित आहे. या एज्यु-सिटीमध्ये भारतातील 12 नामांकित विद्यापीठे समाविष्ट असतील आणि ती सुमारे 200 एकर जागेवर विकसित केली जाईल. या संकुलात सुमारे 1 लाख विद्यार्थी शिक्षण घेतील.

**इनोव्हेशन सिटीचा विकास**

सुमारे 300 एकर क्षेत्रात एक इनोव्हेशन सिटी उभारली जाणार आहे. तसेच, मुंबईला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर ठेवण्यासाठी 1,000 एकर क्षेत्रात नॉलेज सिटी उभारण्यात येणार आहे. येत्या पाच वर्षांत या प्रकल्पांमुळे मुंबईचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलणार आहे.

# शिवकालीन किल्ल्यांना मिळाला युनेस्कोचा गौरव

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्राच्या शौर्याला जागतिक ओळख**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम आणि सामरिक दूरदृष्टीचे प्रतीक असलेल्या 12 ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा (World Heritage Site) दर्जा प्राप्त झाला आहे. या यादीत महाराष्ट्रातील 11 आणि तमिळनाडूमधील एक असा एकूण 12 किल्ल्यांचा समावेश आहे. ही यशोगाथा केवळ इतिहासापुरती मर्यादित नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचाही विजय आहे. राज्य सरकार, पुरातत्व विभाग आणि केंद्र सरकार यांचा या मान्यतेत मोलाचा वाटा असून, या ऐतिहासिक घडामोडीमागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व अत्यंत निर्णायक ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली दुर्गनगरी ही केवळ सामरिकदृष्ट्या अभेद्य नव्हती, तर स्थापत्यकलेचा अनुपम नमुनाही होती. रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, लोहगड, पन्हाळा, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी (महाराष्ट्र) आणि जिंजी (तमिळनाडू) हे किल्ले या यादीत समाविष्ट आहेत.

"अद्वितीय जागतिक मूल्य" (Outstanding Universal Value) या निकषांवर हे सर्व किल्ले खरे उतरले. या संपूर्ण प्रक्रियेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने आणि ठाम इच्छाशक्तीने मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतः हा प्रस्ताव पंतप्रधान कार्यालयापर्यंत पोहोचवण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली. ही मान्यता केवळ ऐतिहासिक गौरवाचा सन्मान नाही, तर महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्रासाठी एक नवी ओळख निर्माण करणारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला केवळ रस्ते आणि मेट्रोने जोडले नाही, तर इतिहास, संस्कृती आणि आत्मगौरवाशीही जोडले आहे. ही मान्यता त्यांच्या प्रभावी नेतृत्वाची ठळक साक्ष आहे.

# निसर्गरम्य ठिकाणांवर रिसॉर्टचा कब्जा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची जन्मभूमी, सागरी निसर्ग सौंदर्याने नटलेले आणि इतिहास व परंपरेचा श्वास घेतलेले म्हणजे श्रीवर्धन. कधी काळी नारळ, सुपारीच्या वाड्यांतून आणि भातशेतीच्या लहरांतून कोकणच्या संस्कृतीचा गंध दरवळायचा. आज मात्र तीच भूमी झपाट्याने रिसॉर्ट आणि होमस्टे व्यवसायाकडे वळत आहे.

श्रीवर्धनच्या सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्याचे आधुनिक सुशोभीकरण, स्वच्छता व सुरक्षिततेमुळे येथे पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. याचा सकारात्मक परिणाम स्थानिकांवर झाला.



## कोकणी श्वास हवेत विरून चाललाय!

अनेकांनी घरातील खोली-दालने पर्यटकांसाठी खुली केली. भोजन, नाश्ता आणि स्थानिक कोकणी चवदार पदार्थांनी श्रीवर्धनचे पाहुणचाराचे स्थान बळकट केले.

बेरोजगार तरुणांना काम मिळाले, महिला बचत गटांना हॉटेल्सकडून ऑर्डर्स मिळू लागल्या. आर्थिक स्वावलंबनाचे स्वप्न उभे राहत होते, पण याच पर्यटन व्यवसायात झपाट्याने पैसा मिळतो हे स्वप्न काही शेतकऱ्यांना 'सत्य' वाटू लागले. मागील काही वर्षांत सुमारे २०% बागायतदारांनी आपल्या वाड्यांतील पोफळी, माड व केळीची झाडे तोडून वातानुकूलित खोल्या, रिसॉर्ट्स व खेळाची साधने उभी केली.

यातच भातशेतीकडे तरुणांची पाठ, मजुरांचा अभाव आणि बाजारात अल्प भाव यामुळे काहींनी आपली शेतीच विकायला काढली. मुंबई-पुण्याच्या उद्योजकांना जमिनी विकल्या जाऊ लागल्या.या बदलांनी श्रीवर्धनची पारंपरिक ओळख धोक्यात आली आहे. 'भाताचे कोठार' म्हणून प्रसिद्ध असलेले हे गाव आता 'रिसॉर्ट्स व रेस्टॉरंट्सचे गाव' म्हणून ओळखले जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

वर्षभरात जेवढं मिळतं त्याहून जास्त महिनाभरात मिळतं, या मानसिकतेतून आज झाडे तोडली जात आहेत, पण उद्याचा विचार करताना हरवत चाललेली ही हिरवळ आणि कोकणचा खरी ओळख टिकेल का, हाच खरा प्रश्न उरतोय.

श्रीवर्धनसारख्या ऐतिहासिक आणि निसर्गसंपन्न गावांनी पर्यटनात वाढ झाली असली तरी पारंपरिक शेती व संस्कृती टिकवण्यासाठी संतुलन राखणे अत्यावश्यक आहे.

# रोठखुर्द ग्रामपंचायतीतर्फे ज्येष्ठ नागरिकांचा गौरव



**रोहे : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील रोठखुर्द ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामपंचायत हद्दीतील ज्येष्ठ नागरीकांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याचबरोबर दिव्यांग कल्याण निधी व १५ टक्के टक्के मागासवर्गीय खर्चातुन साहीत्य वाटप करण्यात आले.

या वेळी सरपंच गीता जनार्दन मोरे, उपसरपंच मेघा अमोल ढमाले, सदस्य जनार्दन मोरे, सचिन मोरे, राकेश मोरे, महेंद्र कांबळे, सदस्या सुनिता मोरे, ज्योती डाके, हर्षाली कांबळे, मा. सरपंच लिलाधर मोरे, मा. सरपंच रमेश मोरे, देवराम कणेकर, विठ्ठल बोरेकर, दिपक कर्णेकर, उमाजी मोरे, हिराजी मोरे, गोपाल जोशी, सखाराम मोरे, विश्वास बोरेकर, प्रकाश डाके, मंगेश मोरे, अमोल ढमाले, जगदिश मोरे आदी उपास्थित होते.

या वेळी सरपंच गीता जनार्दन मोरे यांनी खा.सुनील तटकरे यांचे वाढदिवसाचे औचित्य साधुन ग्रामपंचायत हद्दीतील जेष्ठ नागरीकांचा सन्मान करण्यात आला. ग्रामपंचायतीमधील जेष्ठ नागरीकांच भरीव योगदाना बद्दल आज सत्कार करण्यात येत असल्याचे सांगितले खा.सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग कल्याण निधी व १५ टक्के मागासवर्गीय खर्चातुन साहीत्य वाटप हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. खा. साहेबांच्या माध्यमातून विविध योजना ग्रामपंचायत मध्ये आले आहेत.

ग्रामसेवक राजु देसाई यांनी दिव्यांग कल्याण निधी व १५ टक्के मागासवर्गीय खर्चातुन साहीत्य वाटप करण्यात येत असल्याचे सांगितले.

# चौल ज्येष्ठ नागरिक संस्थेची कोकण ज्ञानपीठला भेट



**कर्जत : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या सदस्यांनी कर्जतमधील कोकण ज्ञानपीठ संस्थेच्या महाविद्यालयांना भेट देऊन शिक्षकांशी संवाद साधला. त्यानंतर वृक्षारोपण करून उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

कोकण ज्ञानपीठ संस्थेचे सदस्य झुलकरनैन डाभिया, चौल ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या सल्लागार उषा वैद्य, अध्यक्ष सतीश मनोहर, उपाध्यक्ष दीपक तळेकर, सचिव देवानंद पोवाळे, खजिनदार अनिल राईलकर, रोहिदास म्हात्रे, विनोद जाधव, वनिता राऊत, अरविंद जाधव, शंकर पाटील आदी ६० ते ८५ वयोगटातील पंचेचाळीस सदस्य उपस्थित होते. कोकण ज्ञानपीठ संस्थेच्या राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात आल्यानंतर त्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी केले.

सेमिनार हॉलमध्ये एका छोटेखानी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे यांनी संस्थेची माहिती सांगितली. डॉ. काळे यांनी महाविद्यालयाचा चढता आलेख सविस्तरपणे सांगितला. उषा वैद्य यांनी, मी येथील अभिनव ज्ञानमंदिर संस्थेमध्ये अध्यापनाचे काम केले आहे. अनेक विद्यार्थी घडविले. हे सर्व विद्यार्थी मोठ मोठ्या पदावर आहेत. ते अजूनही माझ्यावर आईप्रमाणे जीवापाड प्रेम करतात. ही सर्व माझी मुले आहेत असे मी समजते, असे स्पष्ट केले.

सतीश मनोहर यांनी, आमच्या ज्येष्ठ नागरिक संस्थेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. आम्ही विविध उपक्रम राबवित असतो. आज आम्हाला वैद्यबाईंची खरी ओळख समजली, असे सांगितले. देवानंद पोवळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर सर्व जेष्ठ नागरिकांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण केले.

या वेळी प्रतिभा घरत, कुमार जोगळेकर, भास्कर घरत, विजय वर्तक, चंद्रकांत थळे, शैलेश घोसाळकर, सुनील काठे, भास्कर तुरे रमेश म्हात्रे, संगीता बैकर आदी उपस्थित होते.

# साळावच्या जिंदल विद्यामंदिरात कौशल्य विकास सत्र

**मुरुड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील प्रत्यक्ष ज्ञान व अनुभव मिळावा यासाठी जिंदल विद्यामंदिर साळाव येथे दोन दिवसीय कौशल्य विकास सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. विद्युत दुरुस्ती, सुतारकाम व नळकाम यांसारख्या आवश्यक व्यावसायिक कौशल्यांचा प्रत्यक्ष अनुभव या वेळी विद्यार्थ्यांनी घेतला.

जेएसडब्ल्यू प्रकल्पाचे सहाय्यक व्यवस्थापक व विद्युत अभियंता कार्तिक परिहार यांनी 'विद्युत जागरूकता' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून विद्युत क्षेत्रातील मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविल्या आणि उद्योगातील वास्तव अनुभव विद्यार्थ्यांशी शेअर केला.

सुतारकाम सत्रात माखनलाल जांगिड यांनी विद्यार्थ्यांना विविध लाकडी उपकरणांचा वापर, सुरक्षितता व प्रत्यक्ष कारागिरीचे महत्त्व पटवून दिले. नळकाम सत्रात सुनील भोईर यांनी नळजोडणी, दुरूस्ती, फिटिंग्ज व सुरक्षित हाताळणीबाबत सखोल माहिती दिली.

सर्व सत्रांत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांवर भर देण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ संकल्पना नव्हे, तर प्रत्यक्ष कौशल्य आत्मसात केले. प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या उद्योगस्नेही व अनुभवाधारित शिक्षण दृष्किोनाला अनुसरून हे सत्र राबविले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले, अशा कृतीशील उपक्रमांमुळे विद्यार्थी केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार होतात.



# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अलिबाग तालुका अध्यक्षपदी सुभाष म्हात्रे

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण अध्यक्ष शैलेश पालकर ,रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हातील अलिबाग तालुका कार्यकारिणीची सभा अलिबाग येथे संपन्न झाली. या वेळी तालुका अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ पत्रकार सुभाष म्हात्रे यांची अध्यक्षपदी, उपाध्यक्षपदी सुयोग आंग्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

यावेळी कार्यकारणी अध्यक्ष सुभाष म्हात्रे,उपाध्यक्ष सुयोग आंग्रे ,सचिव प्रमिला जोशी, खजीनदार धनंजय कवठेकर,सल्लागार आविष्कार देसाई,प्रसिद्धी प्रमुख महेंद्र म्हात्रे, सदस्य निलेश फुंडे, विजय चवरकर, अब्दुल सोगावकर, सुनील बुरुमकर.यांची निवड करण्यात आली आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष सुभाष म्हात्रे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले की,तालुका संघाच्या नियोजनाची अंमलबजावणी करणे, पत्रकारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. तसेच सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले व संघाच्या कार्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कार्यरत राहण्याचे आश्वासन दिले.

# तुकाराम सुतार विभागीय अध्यक्षपदी

**माणगाव** : तालुक्यातील वाकी तर्फे निजामपूर गावचे पुत्र व पंचायत समितीचे माजी उपाध्यक्ष तुकाराम सखाराम सुतार यांची निजामपूर विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विभागीय अध्यक्षपदी पक्षाचे तालुकाध्यक्ष काका नवगणे यांनी नियुक्ती केली आहे.



याबाबतचे नियुक्तीपत्र सुतारवाडी येथे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते तुकाराम सुतार यांना देण्यात आले. या वेळी पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, जिल्हा युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी, महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, बाबूशेठ खानविलकर, माणगाव तालुकाध्यक्ष काका नवगणे, सुभाष निकम, हनुमंत जगताप, शरद सावंत, घनशाम तटकरे, निजामपूर विभाग सचिव किरण पागार आदी उपस्थित होते.

# माजी सरपंच गोपीनाथ जाधव ग्रामसमृद्धी पुरस्काराने सन्मानित



**खोपोली : प्रतिनिधी**

माजगाव ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गोपीनाथ जाधव यांच्या कारकिर्दित झालेल्या विकासकामांची दखल घेत त्यांना नालंदा ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून ग्रामसमृद्धी पुरस्कार श्रीकांत जायभाय यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. हा समारंभ पुणे नवी पेठ येथील एस.एम. जोशी सभागृहात झाला.

माजी सरपंच गोपीनाथ जाधव यांनी २०१९ ते २०२२ या वर्षात विविध विकासकामे करुन जनतेच्या मनामध्ये आपले घर निर्माण केले. ग्रामविकासाचे वचन दिले आणि स्थानिक समाजाच्या विकासासाठी उत्कृष्ट विचारांची देवाणघेवाण केली. गावात असलेल्या समस्या विचारात घेत त्या मार्गी लावण्याचे काम केले. विशेष म्हणजे महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्याचे काम त्यांच्या कारकिर्दीत पूर्ण केले.

सरपंचपद हे राजकीय असले तरी यामध्ये समाजकारण करून जनसामांन्याचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम जाधव यांनी केले. यामुळे त्यांची दखल नालंदा ऑर्गनायझेशनने घेऊन त्यांना सन्मानित केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त कृषी सहसंचालक श्रीपाद खळीकर, अभिनेता, लेखक, दिग्दर्शक विनोद वणवे, त्याचबरोबर पनवेलमधील ग्रामसेवक निवृत्ती आंधळे, जनार्दन जाधव, जगदिश पिंगळे, अरुण जाधव, आत्माराम जाधव उपस्थित होते. पुरस्काराबद्दल अनेकांनी जाधव यांचे अभिनंदन केले.

# बोरघर हायस्कूलला चार लाखांचा धनादेश

**तळा : प्रतिनिधी**

रायगडभूषण समाजसेवक कृष्णा महाडीक यांच्या सहकार्यातून तळा तालुक्यातील ज्ञानदीप माध्यमिक विद्यामंदिर बोरघर हवेली या विद्यालयास सामाजिक कार्यकर्त्या अरुणा बापट यांनी प्रवेशद्वार ते मुख्य इमारतीपर्यंतचा रस्ता पेव्हर ब्लॉकचा बनविण्यासाठी चार लाखांचा धनादेश दिला आहे.



आजपर्यंत कृष्णा महाडीक यांच्या माध्यमातून विद्यालयाच्या इमारत नूतनीकरणासाठी अंदाजे पंधरा लाखांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना बेंचेस, शैक्षणिक साहित्य, टेबल, खुर्च्या, कपाटे इत्यादी साहित्य वेगवेगळ्या दानशूर व्यक्तींच्या मार्फत मिळवून दिले आहे.

कृष्णा महाडिक यांनी केलेल्या निस्वार्थी सेवेसाठी संस्थेचे अध्यक्ष नाना दळवी, उपाध्यक्ष पांडुरंग माळी, कानू विचारे, सचिव मनोहर काप, खजिनदार मनोहर करण, शाळेचे चेअरमन यशवंत मोंढे, संस्थेचे पदाधिकारी, सर्व सदस्य यांनी आभार मानले.

# विचुंबे येथे गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

**पनवेल : वार्ताहर**

गुरुवर्य संगीतरत्न श्री कृष्णा पांडुरंग काडवे यांचा गुरुपौर्णिमा उत्सव सर्व शिष्यगण आणि श्री लिंगेश्वर प्रासादिक भजन मंडळ, सांताक्रूझ यांच्या विद्यमाने जि.प. शाळा विचुंबे, पनवेल येथे उत्साहात आणि आनंदात पार पडला.

या कार्यक्रमाला संपूर्ण मुंबई, ठाणे, पालघर येथील शिष्यगण हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पखवाज वादक ह.भ. प. विक्रम थोरात यांनी केले. कार्यकमाचे दीप प्रज्वलन सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाचे अध्यक्ष केशव राणे,माऊली विचुंबे गावचे माजी उपसरपंच रविंद्र भोईर, लोकनियुक्त सरपंच प्रमोद भिंगारकर, माजी सभापती प्रणाली भोईर, ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब गायकवाड यांच्या शुभहस्ते झाले या कार्यक्रमासाठी कृष्णा काडवे बुवा यांचे असंख्य शिष्य तसेच माजी उपसरपंच किशोर सुरते, नयनजी म्हात्रे, ह.भ.प. धरम म्हात्रे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.



अखिल भजन सांप्रदाय हितवर्धक मंडळ चे कार्याध्यक्ष राजा दळवी, स्वप्नील मांजरेकर माऊली यांनी शुभेच्छा दिल्या. शिष्य परिवाराने गायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सुजल काडवे, वेदांत काडवे, समीर घाडी माऊली, योगेश देसाई यांनी पखवाज साथ केली. कार्यक्रमाचे छायाचित्रण साई पारकर यांनी केले. या कार्यक्रमास महिला वर्गाची उपस्थिती लक्षणीय होती. या कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष तुलसीदास राऊत बुवा,उपस्थित गुरुबंधू विकास सोये, योगेश चाफेकर, संजय जाधव, महेश चव्हाण, सचिन काडवे, नवीन काडवे, तेजस वारंग,भास्कर चव्हाण, गुरु, विश्वदीप तांबे, सुशील लाड बुवा, सुरेश पार्सेकर, लवू पांचाळ, सुनील म्हसकर, एकनाथ वाडेकर, सोमनाथ मांगडे, सिद्धेश पाभरेकर, रवी मोरे, मंगेश सावंत, मारुती गुरव इतर शिष्य गणांनी विशेष मेहनत घेतली.

# बचत गटाच्या महिलांकडून भात लावणी

**पाली : प्रतिनिधी**

भाताचे कोठार असणाऱ्या रायगड जिल्ह्यात भात शेतीचे क्षेत्र घटत आहे. दुसरीकडे या शाश्वत रोजगारात घट झाल्याने रोजगारासाठी राज्यात-परराज्यात होणारे स्थलांतर वाढत आहे, मात्र सुधागड तालुक्यातील चिखलगाव आदिवासी वाडीतील 'भवानी बचत गटाच्या' महिला स्थलांतर थांबवण्यासाठी व आयुष्यभराच्या मजुरीच्या चक्रातून बाहेर पडण्याची धडपड करत स्वतः भातशेती करण्यासाठी पुढे आल्या आहेत. या महिलांनी आता मिळून भात लावणी केली. यावेळी कृषी अधिकारी देखील शेतात उतरले होते.



पिढ्यानपिढ्या इतरांसाठी मेहनत करत राहिलेला आदिवासी समाज आता स्वतः साठी मेहनत करून वर्षभराची किमान बेगमी करण्याचा प्रयत्न करताना मात्र एकटा पडताना दिसतो. म्हणूनच या प्रयत्नात त्यांच्या हातांना बळ देण्यासाठी महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संस्था प्रयत्न करत आहे. गटशेतीच्या विविध टप्प्यावर आवश्यक सर्व सहकार्य आणि मार्गदर्शन करत आहे.

कातकरी महिलांच्या या शेतीगटाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ आयोजित या भातलावणी कार्यक्रमासाठी तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम, शेती व आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, सर्पमित्र अमित निंबाळकर, समाजबंध संस्थेचे सचिन आशा सुभाष यांनी उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले. सोबतच कृषी सहाय्यक, विभाग कृषी अधिकारी, समाजबंध संस्थेचे कार्यकर्ते, प्रबोधन युवा प्रेरणा शिबिरातील युवा व महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ टीम याची विशेष उपस्थिती होती.

या वेळी कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी रोपलावणीच्या आधुनिक पद्धतींबाबत मार्गदर्शन केले तसेच प्रत्यक्ष भातलावणी मध्येही सहभागी होवून प्रात्यक्षिक दाखवले. याआधी महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ आयोजित बीजप्रक्रिया कार्यशाळेच्या माध्यमातून पेरणी केलेल्या जया व कोमल या जातीच्या बियाण्याला योग्य बीजप्रक्रिया करण्यात आलेली आहे. यावेळी देखील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर कार्यशाळेला उपस्थित राहून मार्गदर्शन केले होते.

# भारत-इंग्लंड आजपासून चौथा कसोटी सामना

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना २३ जुलैपासून मँचेस्टर येथे खेळवला जाणार आहे. पण त्या आधी भारतीय संघातील दुखापतींच्या सत्रामुळे चौथ्या कसोटी सामन्यापूर्वी संघनिवडीचा पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, भारताचे माजी सलामीवीर आकाश चोप्रा यांनी आपल्या संभाव्य अंतिम ११ खेळाडूंची निवड केली असून, त्यात यष्टीरक्षक फलंदाज ध्रुव जुरेलला सहाव्या क्रमांकावर स्थान दिले आहे.



तिसऱ्या कसोटी सामन्याच्या समाप्तीनंतर आणि चौथ्या कसोटीच्या प्रारंभापूर्वी भारतीय संघात जणू समस्यांचे वादळच आले आहे. दुखापतींच्या रूपाने हे संकट समोर आले असून, त्यामुळे अनेक प्रमुख खेळाडूंना संघाबाहेर बसावे लागले आहे.

अर्शदीप सिंग आणि नितीश कुमार रेड्डी हे दुखापतीमुळे संघातून बाहेर झाले आहेत, तर ऋषभ पंत आणि आकाश दीप हेदेखील पूर्णपणे तंदुरुस्त नाहीत. या दुखापतींनी भारताच्या इंग्लंड दौऱ्यातील मोहिमेला मोठा धक्का दिला आहे. या सर्व समस्यांमध्ये भारताचा अंतिम संघ कसा असावा, याबाबत आकाश चोप्रा यांनी आपल्या 'यूट्यूब' चॅनलवर सविस्तर विश्लेषण केले आहे.

आकाश चोप्राच्या मते, सलामीची जबाबदारी केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांच्यावरच सोपवावी, कारण दोघेही सध्या चांगल्या लयीत आहेत. 'यशस्वी मागील सामन्यात अपयशी ठरला, पण प्रत्येक सामन्यात त्याने धावा कराव्यात हे आवश्यक नाही. त्याच्यात क्षमता आहे आणि तो निश्चितपणे पुनरागमन करेल,' असे चोप्राने सांगितले.

तिसऱ्या क्रमांकासाठी त्यांनी करुण नायरला पसंती दिली आहे. चोप्रा याच्या मते, 'ही करुणसाठी अखेरची संधी ठरू शकते. या सामन्यात तो अपयशी ठरल्यास, त्याचे संघातील पुनरागमन कठीण होऊ शकते. त्याची कामगिरी जरी उत्कृष्ट नसली, तरी तो खेळू शकत नाही असेही दिसले नाही. त्यामुळे माझ्या संघात तिसऱ्या क्रमांकावर तोच असेल.'

संघाचे नेतृत्व शुभमन गिलकडेच राहील आणि तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. ऋषभ पंतच्या तंदुरुस्तीबाबत चोप्रा म्हणाला, 'जर पंत दुखापतीमुळे यष्टीरक्षण करू शकत नसेल, तर त्याला एक विशेषज्ञ फलंदाज म्हणून संघात स्थान द्यावे. अशा परिस्थितीत, सहाव्या क्रमांकासाठी ध्रुव जुरेल हा सर्वोत्तम पर्याय आहे. सध्या त्याच्याशिवाय या जागेसाठी दुसरा योग्य खेळाडू दिसत नाही. जर पंत यष्टीरक्षण करत असेल, तर नितीश रेड्डीच्या जागी ध्रुव जुरेलला एक क्षेत्ररक्षक म्हणूनही खेळवता येईल.'

अष्टपैलू खेळाडू म्हणून रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांचा संघात समावेश करावा, तर वेगवान गोलंदाजीची धुरा जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांच्याकडे सोपवावी. तिसरा वेगवान गोलंदाज म्हणून अंशुल कंबोजला संधी मिळण्याची शक्यता आहे. 'प्रसिद्ध कृष्णाला दोन सामन्यांमध्ये संधी मिळाली, मात्र तो खूप महागडा ठरला होता. त्यामुळे अंशुल कंबोज या सामन्यातून पदार्पण करू शकतो,' असेही चोप्राने नमूद केले.

**निवडलेला संभाव्य संघ**

के.एल. राहुल, यशस्वी जैस्वाल, करुण नायर, शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, अंशुल कंबोज,.

# स्व. बुवा साळवी चषक राज्यस्तरीय कबड्डी : कर्जतचा मिडलाईन उपविजेता



**कर्जत : प्रतिनिधी**

स्व. बुवा साळवी चषक राज्य स्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये पुण्याचा सतेज संघ बाणेर संघाने अजिंक्यपद पटकाविले. तर कर्जतच्या मिडलाईन संघाने उपविजेतेपद मिळविले. या स्पर्धेत राज्यभरातील सोळा संघांनी सहभाग घेतला होता.

बालेवाडी पुणे येथील बाबुराव चांदेरे प्रतिष्ठानने स्व. बुवा साळवी चषक राज्य स्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील पुणे, रायगड, कोल्हापूर, मुंबई, नांदेड, रत्नागिरी आदी नामवंत १६ संघांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत सतेज बाणेर संघ पुणे विजेता ठरला तर मिडलाईन कर्जत संघाने उपविजेतेपद पटकावले. मिडलाईन संघाला दीड लाख रुपये आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले. प्रशिक्षक अनिकेत म्हात्रे आणि भगवान शिंदे यांचे मार्गदर्शन खाली मिडलाईने संघाने नेत्र दीपक कामगिरी करून कर्जत तालुका तसेच रायगड जिल्ह्याचे नाव मोठे केले.

कर्जत मिडलाईन संघामध्ये वैभव मोरे (कर्णधार), नीलेश निकम, सौरभ वाईकर, प्रतीक बैलमारे, आर्यन ढोबळे, सुग्रीव पूरी, ऋषी घागरे हे सहभागी होते. उत्कृष्ट चढाई म्हणुन आर्यन ढोबळे याने उत्कृष्ट चढाईचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# रेड रन मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त अलिबाग येथे रेड रन मॅरेथॉनचे भव्य आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई यांच्या आदेशानुसार आणि रायगड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड-अलिबाग आणि लायन्स क्लब, श्रीबाग यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली.

स्पर्धेचे उद्घाटन डॉ. निशिकांत पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. या वेळी डॉ. किरण शिंदे (निवासी वैद्यकीय अधिकारी), डॉ. अनंत बिडकर (अधिष्ठाता प्रतिनिधी), डॉ. रवी वरट, डॉ. बंडेवाड, डॉ. प्रवीण कंदाडे, संजय माने (जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक), अमित पुंडे (जिल्हा युवा अधिकारी), ॲड. निहा अनिस राऊत (संस्थापक), लायन्स क्लब पदाधिकारी आदी उपस्थित होते. स्पर्धा अलिबाग समुद्रकिनाऱ्यापासून सुरू होऊन कॉंग्रेस भुवनमार्गे हिराकोट तलाव फेरी करून पुन्हा समुद्रकिनाऱ्यावर पूर्ण झाली.

स्पर्धेत मुलांमध्ये स्वागत समीर पाटील (पीएनपी कॉलेज, वेश्वी, अलिबाग), अमर भागोजी धुमाने (केईएस डॉ. सी.डी. देशमुख कॉलेज, रोहा) व अशोक बाळाराम वारगुडे (भाऊसाहेब नेने कॉलेज, पेण); तर मुलींमध्ये नेहा हेमंत म्हात्रे (जेएसएम कॉलेज, अलिबाग), अदिती बबन मेंगाळ (भाऊसाहेब नेने कॉलेज, पेण) व प्रणाली शशिकांत तळेगावकर (पीएनपी कॉलेज, वेश्वी) यांनी यश संपादन केले.

विजेत्यांना गौरवण्यात आले. भूमी म्हात्रे आणि पर्णवी मयेकर यांनी लहान वय असूनही स्पर्धेत सहभाग घेतल्याबद्दल त्यांना ॲड. निहा अनिस राऊत यांच्यातर्फे उत्तेजनार्थ विशेष बक्षीस देण्यात आले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन संजय माने यांनी केले.



# पोयनाड येथील कॅरम स्पर्धेत राजेश गोहिल चॅम्पियन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशन व झुंझार युवक मंडळ पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने पोयनाड येथील जय मंगल कार्यालय येथे स्व. नथुरामभाऊ पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून कॅरम दिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय पुरुष एकेरी कॅरम स्पर्धेत कामोठे येथील राजेश गोहिल यांनी अंतिम विजेते ठरले. अंतिम सामन्यात त्यांनी पनवेलचे सचिन नाईक यांचा पराभव केला.



राजेश गोहिल यांना रोख रुपये सात हजार रुपये व 'झुंझार'चे माजी अध्यक्ष पै.अन्वर बुराण स्मृतीचषक देऊन गौरविण्यात आले. उपविजेत्या सचिन नाईक यांना रोख पाच हजार रुपये व चषक बक्षीस म्हणून देण्यात आले. तृतीय क्रमांक २५०० रुपये व चषक अलिबागच्या देवेन सिनकर यांनी पटकावला, तर चतुर्थ क्रमांक २५०० रुपये व चषकाचे मानकरी श्याम घायवत ठरले. स्पर्धेतील पाचवा क्रमांक सुरेश बीस्त, सहावा क्रमांक निखिल कोशिमकर, सातवा क्रमांक अभिजित तुळपुळे, तर आठवा क्रमांक आशिष देशमाने यांना प्रत्येकी एक हजार व चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत ९ ते १६ क्रमांकावर असणाऱ्या खेळाडूंना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १६८ कॅरम खेळाडूंनी सहभाग घेतला होता. बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीष तुळपुळे, सचिव दीपक साळवी, मनोहर पाटील, सहसचिव अभिजित तुळपुळे, झुंझार युवक मंडळचे सचिव किशोर तावडे, तहसीन बुराण, क्रीडाप्रमुख नंदकिशोर चवरकर, अजय टेमकर, योगेश चवरकर, सुजित साळवी, ॲड. पंकज पंडित, पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सदस्य भरतशेठ जैन, पोयनाडचे माजी सरपंच भूषण चवरकर, आंबेपूरचे माजी सरपंच शैलेश पाटील, शहापूरचे सदस्य स्वप्नील पाटील, राजेंद्र जाधव, चेतन पाटील यांच्यासह खेळाडू व कॅरमप्रेमी उपस्थित होते.

# अक्रमचे दोन विक्रम बुमराहला खुणावताहेत

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाला दुहेरी दुखापतींचा मोठा फटका बसला आहे. युवा अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डी गुडघ्याच्या दुखापतीमुळे मालिकेतील उर्वरित सामन्यांमधून बाहेर पडला आहे, तर वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग आगामी मँचेस्टर कसोटीत खेळू शकणार नाही. या दोन प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे जसप्रीत बुमराहची भूमिका अधिकच महत्त्वपूर्ण बनली आहे.



या सामन्यात बुमराहला दोन मोठे विक्रम आपल्या नावे करण्याची सुवर्णसंधी आहे. जर तो मँचेस्टर कसोटीत खेळला आणि पाच बळी मिळवण्यात यशस्वी ठरला, तर तो इंग्लंडच्या भूमीवर सर्वाधिक कसोटी बळी घेणारा आशियाई गोलंदाज ठरेल. सध्या या यादीत पाकिस्तानचे दिग्गज गोलंदाज वसीम अक्रम ५३ बळींसह अव्वल स्थानी आहेत, तर बुमराहने ११ कसोटी सामन्यांत ४९ बळी घेतले आहेत. सध्या तो आणि वसीम अक्रम प्रत्येकी ११ वेळा हा पराक्रम करून बरोबरीत आहेत. बुमराहने पाच बळी घेण्याची कामगिरी केली, तर तो या यादीत अग्रस्थानी पोहचेल.

दुखापतग्रस्त खेळाडूंची अनुपस्थिती आणि मालिकेत बरोबरी साधण्याची संधी पाहता, बुमराहचे मँचेस्टर कसोटीत खेळणे जवळपास निश्चित मानले जात आहे. भारताच्या आशा त्याच्या कामगिरीवर अवलंबून असतील आणि त्याचबरोबर विक्रमांच्या पुस्तकात आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरण्याची संधीही त्याच्यासमोर असेल.

# श्रेयस अय्यरचा ट्रॅकवर धावतानाचा व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५च्या फायनलच्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाला पराभवाचे तोंड पहावे लागले. संघाच्या सर्व चाहत्यांना श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब यंदा ट्रॉफी उंचवणार असे वाटत होते, पण संघ पराभूत झाला.

या संपूर्ण स्पर्धेत श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाचे भरभरून कौतुक झाले. दरम्यान, आता पुन्हा एकदा अय्यर चर्चेत आला आहे आणि त्याचे कारण पंजाब किंग्ज संघाने त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवरून पोस्ट केलेला व्हिडीओ आहे.



या व्हिडीओमध्ये श्रेयस अय्यर ट्रॅकवर वेगाने धावताना दिसत आहे.

या वेळी त्याने काळ्या रंगाची शॉर्ट आणि लाल रंगाचे स्निकर घातल्याचे व्हिडीओमध्ये पहायला मिळत आहे, तर या व्हिडीओला 'भाग भाग भाग शेर आया शेर' असे कॅप्शनदेखील देण्यात आले आहे. सोशल मिडियावर हा व्हीडिओ चर्चेत आला आहे.

सोबो मुंबई फाल्कन्स संघाकडून खेळण्यासाठी श्रेयस मैदानावर उतरला होता. त्यानंतर सध्या तो ब्रेकवर आहे. सध्या भारतीय क्रिकेट संघ इंग्लडमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळत आहे, पण या संघात अय्यरला स्थान मिळाले नाही.













**पनवेल : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल विधानसभा मतदार संघातील पनवेल, कामोठे, कळंबोली, आकुर्ली, खांदा कॉलनी, खारघर, ओवेपेठ आदी विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com